पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ●वर्ष १६ ●अंक २८ ●सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

सुख व्यक्तीचा अहंकार आणि दु:ख व्यक्तीच्या धैर्याची परीक्षा घेते.




## »थोडक्यात

### भाजप सोडा, पहिल्या ओबीसी मुख्यमंत्री व्हा!

**चंद्रपूर :** भाजप नेत्या आणि राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी रिटायर व्हावसं वाटतं, असं विधान केलं आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. पंकजा मुंडे यांच्यया विधानाचे राजकीय वर्तुळात पडसाद उमटले आहेत. काँग्रेसने तर पंकजा मुंडे यांना भाजप सोडून काँग्रेसमध्ये येण्याचे आणि मुख्यमंत्री होण्याची ऑफर दिली आहे. त्यावर पंकजा मुंडे यांची अद्याप प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, काँग्रेसने राजकीय वर्तुळात उलथापालथ करणारं विधान केल्याने या ऑफरची चर्चा रंगली आहे.काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मीडियाशी संवाद साधताना पंकजा मुंडे यांना ही थेट ऑफर दिली आहे. ओबीसी नेतृत्वाला बाजूला करण्याचे काम मुंडे साहेब गेल्यानंतर सुरू झाले. पंकजा मुंडे यांना पक्षात न्याय मिळत नाही, असे वाटत असेल, त्यामुळे त्या भावना उफाळून येतात. पंकजा मुंडे यांना आमची विनंती राहील की, तुम्ही भाजपमधून बाहेर पडून बिनधास्त नेतृत्त्व करा आणि महाराष्ट्रातील पहिल्या महिला मुख्यमंत्री व्हा. यासाठी आम्ही तुम्हाला साथ देऊ. भाजमधून बाहेर पडा. मैदानात या. आम्ही तुम्हाला काँग्रेसमध्ये घेऊ. पंकजा मुंडे काँग्रेसमध्ये येत असतील तर नेतृत्वाला विचारून नक्की निर्णय घेऊ, असं विधान विजय वडेट्टीवार यांनी केलं आहे.

### प्रशांत किशोर भाजप अध्यक्षांच्या अभेद्य गडाला भगदाड पाडणार!

**पाटणा :** येथील बांकीपूर पोटनिवडणुकीसाठी मतमोजणी सुरू आहे. पहिल्या फेरीनंतर, जनसुराजचे प्रशांत किशोर ८६२ मतांनी आघाडीवर आहेत. भाजपचे नीरज सिन्हा १,३६३ मतांसह दुसऱ्या स्थानावर आहेत, तर आरजेडीच्या रेखा गुप्ता मागे पडल्याचे दिसत आहे. त्यांना दोन फेऱ्यांमध्ये ५०५ मते मिळाली आहेत. ए.एन. कॉलेजमध्ये सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. सर्वप्रथम पोस्टल मतपत्रिकांची मोजणी करण्यात आली. आता ईव्हीएम मतांची मोजणी सुरू आहे. १४ टेबलांवर ३१ फेऱ्यांमध्ये मतमोजणी केली जाईल. मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली असून, ड्रोनद्वारे मतमोजणीवर लक्ष ठेवले जात आहे. या पोटनिवडणुकीत जनसुराजचे संस्थापक प्रशांत किशोर, भाजपचे नीरज सिन्हा आणि आरजेडीच्या रेखा गुप्ता यांच्यासह एकूण २५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. निकालाच्या पार्श्वभूमीवर भाजप विजयाचा जल्लोष करण्याची तयारी करत आहे.

# आधी पंतप्रधान मोदींनी त्यांची डिग्री सार्वजनिक करावी! - अभिजित दिपके

## थेट मोदींनाच आव्हान, वडिलांच्या संपत्तीच्या चौकशीच्या मागणीला उत्तर



प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांचे वडील भगवान दीपके यांच्या मालमत्तेची चौकशी करण्याची मागणी नुकतीच आरटीआय कार्यकर्ते अमित तिवारी यांनी केली होती. यावर दिपके चांगलेच संतापले आहेत. त्यांनी याबाबत बोलताना थेट पंतप्रधान मोदी यांना ललकारले आहे. आमचे पंतप्रधान मोदी यांनी त्यांची डिग्री सार्वजनिक करावी. त्यानंतर मी माझ्या शैक्षणिक खर्चाच्या कर्जाचा सगळा तपशील जाहीर करेन. माझी पदवी खरी आहे. मी आशा करतो की, नरेंद्र मोदी यांची पदवीही खरी असेल, असे अभिजीत दिपके यांनी म्हटले. ते सोमवारी संभाजीनगर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. येत्या ५ तारखेला अभिजीत दिपके यांच्या संभाजीनगरमधील घरी कॉकरोच जनता पार्टीची बैठक होत आहे. याबाबत अभिजीत दिपके यांना विचारणा करण्यात आली. यावर त्यांनी म्हटले की, ५ तारखेला होणाऱ्या बैठकीला कॉकरोच जनता पार्टीचे प्रवक्ते आणि आंदोलन यशस्वी करण्यात प्रमुख भूमिका बजावणारे काही लोक उपस्थित असतील.

### आम्हाला ही जनचळवळच ठेवायची आहे!

आम्ही राजकीय पक्ष स्थापन करावा, असे मिडीयाला वाटते. पण आमचा अजून तसा कोणताही विचार किंवा हेतू नाही. आम्हाला ही जनचळवळ ठेवायची आहे. देशात राजकारणाची परिस्थिती पाहता, नवा राजकीय पक्ष स्थापन करुन काय साध्य होणार आहे? निवडणुकीत मतंच डिलिट केली जातात.

### जिथे निवडणूकच हायजॅक केली जाते, तिथे...!

राजकारणावरुन लोकांचा पूर्ण विश्वास उडाला आहे. सकाळी लोक मतं एकाला देतात, आणि संध्याकाळी सरकार वेगळ्याच पक्षाचे येते. सकाळी जनता एक आमदार, खासदार एक निवडते आणि संध्याकाळी ते दुसऱ्या पक्षात जातात. जिथे ईडी, सीबीआय पाठवून पक्ष तोडण्यात येतात, निवडणूक हायजॅक केली जातात.

# भाजपचे आंदोलने संविधानाच्या कोणत्या चौकटीत



प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मुंबई :** सरसंघचालक मोहन भागवत यांनी 'जेन झी'च्या तरुणांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत, असे म्हटले होते; त्यामुळे त्यांनी जंतरमंतरवरचे आंदोलन संविधानिक आहे की नाही, यावर भाष्य करावे. जर संघातून मोहन भागवत यांच्या मतापेक्षा वेगळा दुसरा आवाज निघत असेल, तर याचा अर्थ मोदी-शहांनी संघामध्ये आपली चमचे पेरले आहेत, असा घणाघाती प्रहार खासदार संजय राऊत यांनी केला.

संजय राऊत म्हणाले, देशातील आंदोलनांना 'संविधान विरोधी' म्हणणे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा अपमान आहे. जर हे आंदोलन घटनाबाह्य असेल, तर जयप्रकाश नारायण यांचे १९७५ चे आंदोलन आणि भाजपने यापूर्वी केलेली आंदोलने संविधानाच्या कोणत्या चौकटीत बसत होती, याचे उत्तर संघ आणि भाजपने द्यावे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा भारतीय संविधानाला आणि तिरंग्याला मानत नाही.

त्यांनी ५२ वर्षे आपल्या कार्यालयावर तिरंगा फडकावला नव्हता आणि त्यांना स्वतःचे स्वतंत्र संविधान निर्माण करायचे आहे.

# साखरेचा पुन्हा 'गोडवा' महाग ! अब तक 55 कल तक 56

प्रतिनिधी ३ ऑगस्ट



**अकोला:** सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरातील महत्त्वाचा घटक असलेल्या साखरेच्या भावाने पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. अकोल्याच्या मुख्य बाजारात साखरेचे भाव तब्बल ५४- ५६ रुपये प्रतिकिलोवर पोहोचल्याने सामान्य ग्राहक अक्षरशः हैराण झाले आहेत. साखरेच्या या नव्या दरवाढीमुळे सण-उत्सवांच्या तोंडावर गृहिणींचे बजेट पार कोलमडले आहे.

साखरेच्या दरात सातत्याने होणाऱ्या वाढीमुळे ग्रामीण भागातील किरकोळ विक्रेते आणि नागरिक आता मोठ्या प्रमाणावर शहरी भागातील मुख्य घाऊक बाजाराकडे धाव घेत आहेत. ग्रामीण भागातील छोट्या दुकानांमध्ये साखर आणखी महाग दराने विकली जात असल्याने, नागरिक शहरातूनच घाऊक दरात साखरेची खरेदी करत आहेत. यामुळे शहरातील घाऊक बाजारात मागणी अचानक वाढली असून, अपुऱ्या पुरवठ्यामुळे आणि वाढत्या गर्दीमुळे शहरी व्यापारी आणि अडत व्यावसायिक पुरते त्रस्त झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून साखरेच्या दरात टप्प्याटप्प्याने वाढ होत होती. मात्र आता थेट ५६ रुपयांचा टप्पा गाठल्याने किरकोळ बाजारात मोठी खळबळ उडाली आहे. 'आधीच महागाईने कंबरडे मोडले असताना आता रोजच्या चहा आणि गोडधोडासाठी लागणारी साखरही आवाक्याबाहेर जात आहे,' अशी उद्विग्न प्रतिक्रिया स्थानिक ग्राहकांनी व्यक्त केली आहे.

मागणीच्या तुलनेत साखरेचा पुरवठा काहीसा मंदावल्याचे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात येत आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली, तर येत्या दिवसांत साखरेचे भाव आणखी भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून साठेबाजीवर चाप लावावा आणि दर नियंत्रणात आणावेत, अशी मागणी अकोलेकरांमधून होत आहे.

# दत्तक विधानातून चिमुकल्या सुशांतला मिळाले प्रेमाचे घर

## उत्कर्ष शिशुगृहात भावूक सोहळा,नव्या आयुष्याची झाली मंगलमय सुरुवात

प्रतिनिधी ३ ऑगस्ट



**अकोला:** प्रत्येक बालकाला सुरक्षित, वात्सल्यपूर्ण आणि प्रेमळ कुटुंबाच्या छत्राखाली वाढण्याचा नैसर्गिक अधिकार असतो. याच अधिकाराची आणि मानवी भावनांची सुंदर अनुभूती देणारा एक अत्यंत हृदयस्पर्शी व भावनिक दत्तक विधान सोहळा बसेरा कॉलनी, मलकापूर येथील उत्कर्ष शिशुगृह येथे पार पडला.

या सोहळ्याच्या निमित्ताने अवघ्या नऊ महिन्यांच्या चिमुकल्या सुशांतच्या आयुष्यात वात्सल्याचा नवा सूर्य उगवला आहे.सुशांतच्या आयुष्यातील या नव्या प्रवासाने उपस्थितांना भावूक केले असून समाजात दत्तक संस्कृतीबाबत एक अत्यंत सकारात्मक संदेश दिला आहे.

नागपूर येथील येथील एका परिवाराने चि. सुशांतला आपल्या कुटुंबाचा सदस्य म्हणून अतिशय आनंदाने आणि प्रेमाने स्वीकारले. औपचारिक दत्तक विधानाची प्रक्रिया पूर्ण होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या नव्या नात्याचे स्वागत केले. बालकाला नवे आई-वडील मिळतानाचा हा क्षण पाहून अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, समाजसेवक, नरेडकोचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक सुनिल इन्नाणी व माधवी इन्नाणी यांच्या शुभहस्ते बालकाचे विधीवत सुपूर्दीकरण करण्यात आले. उत्कर्ष शिशुगृहाच्या प्रकल्प प्रमुख अनघा अजय फडके आणि अधीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पार पडली.

'दत्तक विधान हा केवळ एक कायदेशीर सोपस्कार नसून, एका निरागस बालकाला मायेचे घर आणि त्याच्या भविष्याला नवी दिशा देणारा महान कौटुंबिक व सामाजिक संस्कार आहे.

उत्कर्ष शिशुगृह प्रशासन मान्यवरांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्यास माजी अध्यक्ष विजय जानी, अध्यक्ष चंद्रप्रकाश लढ्ढा, कोषाध्यक्ष गणेश काळकर, उपाध्यक्ष मंगेशजी दीक्षित, गायत्री बालिकाश्रमच्या मिराताई जोशी,जैनेंद्र लुंकड, सी.ए. लक्ष्मीकांत शुक्ला, अशोक पंड्या, आरती लढ्ढा यांच्यासह अनेक सामाजिक क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

### भाजपचे बृजभूषण सिंह यांची निर्दोष मुक्तता!

**दिल्ली :** महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक छळ प्रकरणात भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयाने आज याबाबत निकाल जाहीर केला. बृजभूषण शरण सिंह यांची निर्दोष मुक्तता होताच फटाके फोडून समर्थकांनी जल्लोष केला.

न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर, बृजभूषण शरण सिंह म्हणाले, की, आरोप झाल्यानंतर मी पहिल्याच दिवशी म्हणालो होतो की जर कोणताही आरोप सिद्ध झाला किंवा तसा निकाल लागला, तर मी स्वतःला फाशी लावून घेईन. आज न्यायालयाने माझी सन्मानाने निर्दोष मुक्तता केली आहे. माझ्यासाठी आणि माझ्या समर्थकांसाठी ही आनंदाची बाब आहे. २०१६ ते २०१९ या काळात महासंघाचे कार्यालय, अधिकृत निवासस्थान आणि परदेश दौऱ्यात महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याचा आरोप होता. २०२३ मध्ये विनेश फोगट, साक्षी मलिक आणि बजरंग पुनिया यांच्यासह देशातील आघाडीच्या कुस्तीपटूंनी दिल्लीच्या जंतरमंतरवर मोठे आंदोलन केले होते. आंदोलनानंतर दिल्ली पोलिसात गुन्हा दाखल होऊन आरोपपत्र सादर झाले होते.









## जुन्या शहरातील कोंडवाड्यात जनावरांचा जीव घुटमळतो

**अकोला :** महानगरपालिकचा कोंडवाड़ा विभाग जनावरांची कशी हेळसांड करतो याचे उत्तम उदाहरण समोर आले आहे. जुन्या शहरातील कोंडवाड्यात चिखल झाल्यामुळे गार्यींना धड उभे राहता येत नाही. त्यांच्या चारा पाण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जातो आहे. महापालिका प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी आहे.

शहरात फिरणाऱ्या मोकाट जनावरांना कोंडवाड्यात टाकले जाते. परंतु या ठिकाणी जनावरांच्या चाऱ्या पाण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. जुन्या शहरातील कोंडवाड्याकडे नजर टाकली तर कमालीची अस्वच्छता चिखल झाल्यामुळे जनावरे नीट उभी राहू शकत नाहीत. महापालिका कोंडवाडा विभागाला याकडे लक्ष द्यायला वेळ नाही का असा प्रश्न विचारला जातो आहे. नागरिकांनी आर आर सी नेटवर्कशी बोलताना महापालिका आयुक्तांनी याकडे लक्ष द्यावे.

# दहा वर्षांपासून जीर्णावस्थेत पाण्याची टाकी

## तुटलेल्या पायऱ्यांमुळे साफसफाई बंद

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

अकोट : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, अकोट येथील पिण्याच्या पाण्याची टाकी गेल्या दहा वर्षांहून अधिक काळापासून जीर्णावस्थेत असून तिच्या दुरुस्तीबाबत संबंधित यंत्रणेकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिसून येत आहे. टाकीवरील चढ-उतारासाठी असलेल्या सिमेंटच्या पायऱ्या अनेक वर्षांपूर्वी तुटल्याने टाकीपर्यंत पोहोचणे धोकादायक झाले आहे. परिणामी, अनेक वर्षांपासून टाकीची नियमित साफसफाई बंद असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची वेळोवेळी साफसफाई करणे अत्यंत आवश्यक असते. मात्र, संबंधित टाकीची स्वच्छता होत नसल्याने नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दूषित किंवा अस्वच्छ पाण्यामुळे अतिसार, टायफॉइड, कॉलरा, कावीळ यांसारख्या जलजन्य आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, टाकीची दुरुस्ती आणि स्वच्छतेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. स्थानिक नागरिकांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेकदा याकडे लक्ष वेधले असतानाही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. टाकीची अवस्था दिवसेंदिवस अधिकच जीर्ण होत असून भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा हा नागरिकांच्या मूलभूत गरजांपैकी एक असल्याने त्याची सुरक्षितता आणि गुणवत्ता कायम राखणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे. मात्र, टाकीची दुरुस्ती, पायऱ्यांचे पुनर्बांधकाम आणि नियमित साफसफाई या बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

"गेल्या दहा वर्षांपासून टाकीची अवस्था अशीच आहे. याबाबत आम्ही नगरपरिषदेकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. टाकीची साफसफाई अद्याप झालेली नसली तरी पिण्याच्या पाण्याचे नमुने आम्ही नियमित घेत असतो."

**निखिल राऊत,**
अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, अकोट



## खरीप पीक विमा योजनेची मुदत 10 ऑगस्टपर्यंत वाढवली, शेतकऱ्यांनी संधीचा लाभ घ्यावा

### आत्मा समिती अध्यक्ष शामलभूषण कोकाटे यांचे आवाहन

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** खरीप हंगामातील पिकांना नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ, पावसातील खंड तसेच विविध कारणांमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप पीक विमा भरण्याची मुदत १० ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे विमा योजनेपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना या वाढीव मुदतीचा लाभ घेऊन आपल्या खरीप पिकांचा विमा काढण्याचे आवाहन आ हरीश पिंपळे यांच्या



मार्गदर्शनात करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर मूर्तिजापूर मतदारसंघातील तसेच तालुक्यातील तमाम शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका आत्मा समितीच्या अध्यक्षा शामल भूषण कोकाटे यांनी केले आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना विविध नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागू शकतो. हवामानातील बदल, अतिवृष्टी, पावसाचा खंड, अवकाळी पाऊस, पूर, गारपीट आदी कारणांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास पीक विमा शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधार ठरू शकतो. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी कोणतीही दिरंगाई न करता निर्धारित मुदतीत पीक विमा भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा काढण्यासाठी संबंधित बँक, अधिकृत विमा प्रतिनिधी, आपले सरकार सेवा केंद्र किंवा संबंधित ऑनलाइन सुविधा केंद्राशी संपर्क साधावा, तसेच आवश्यक कागदपत्रांसह विमा अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी. विमा भरताना शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची व क्षेत्राची माहिती अचूक असल्याची खात्री करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## मा. शारदा ज्ञानपीठ मध्ये केडिया ट्रस्ट तर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अकोला :** श्रीराम कृष्ण विवेकानंद सेवा मंडळ द्वारा संचालित मा. शारदा ज्ञानपीठ येथे श्रीमती गोदावरीदेवी बजरंगलाल केडिया ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून वह्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत त्यांना प्रोत्साहन देणे हा होता.

हा कार्यक्रम श्रीराम कृष्ण विवेकानंद सेवा मंडळाचे उपाध्यक्ष डॉ सत्यनारायण बाहेती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून नवलकिशोर केडिया, ॲड. प्रमोद अग्रवाल तसेच प्राचार्य आदित्य अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत खत्री व व्यवस्थापक राहुल देशमुख उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य चे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मनापासून अभ्यास करण्याचे, शिस्त व संस्कार जोपासण्याचे तसेच उज्ज्वल भवितव्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करून ट्रस्टचे आभार मानले.

## वारीच्या डोहात बुडालेल्या तरुणाचा शोध सुरूच




**हिवरखेड :** वारी हनुमान येथे १ ऑगस्ट रोजी दुपारी दर्शनासाठी आलेले ३ भाविक आंघोळीसाठी नदी पात्रात उतरले असता बुडाले होते. यामधील दोघांना बाहेर काढण्यात आले. स्थानिक लोकांच्या मदतीने त्यांना वाचवण्यात यश आले. परंतु खामगाव तालुक्यातील खुटपुरी येथील योगेश प्रकाश वानखेडे या 22 वर्षीय तरुणाचा शोध अजूनही सुरू आहे.

स्थानिक नागरिक व पोलिसांनी शोध घेतला. मात्र, अद्याप पावेतो थांगपत्ता लागला नाही. तेल्हारा तालुका येथील आपत्ती व्यवस्थापन पथकाची मागणी केलेली आहे. शोध चालू आहे अशी माहिती हिवरखेड पोलिसांकडून देण्यात आली. तसेच डोहात पावसामुळे अधिक जास्त पाण्याचा प्रवाह वाढला आहे, त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी सतकर्ता बाळगावी असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## ऑल इंडिया बंजारा सेवा संघ अकोला जिल्हा अध्यक्षपदी नारायण चव्हाण तर कार्यकारी अध्यक्षपदी प्रा. डी. एस. राठोड



**अकोला :** ऑल इंडिया बंजारा सेवा संघ अकोला जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली आहे. आज, रविवारी जिल्हाध्यक्ष नारायण चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सविस्तर चर्चा करून नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

अध्यक्ष: नारायण चव्हाण, कार्यकारी अध्यक्ष प्रा. डी. एस. राठोड, उपाध्यक्ष: प्रा. बी. एस. पवार, आणि सुनील पवार, सचिव सतीश जाधव, कोषाध्यक्ष: प्रा. महेश राठोड, सहसचिव: सतीश राठोड आणि धीरज आडे, प्रसिद्धी प्रमुख: कुंदन जाधव, संघटक: भीमराव राठोड, कुणाल जाधव, महादेव राठोड आणि नरेंद्र आडे सदस्य: बंडू राठोड आणि प्रवीण राठोड या निवडीनंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## काटेपूर्णा प्रकल्पात 25 टक्के जलसंचय

**अकोला :** काटेपूर्णा प्रकल्पात 25 टक्के जलसंचय झाला आहे. प्रकल्पाची पातळी 341.60 मी, साठा 21.841 mm3, टक्केवारी 25.29.

तेल्हारा तालुक्यातील वान प्रकल्प पातळी 405.60 मी, साठा 55.24mm3, टक्केवारी 67.40. मोर्णा प्रकल्प ता. पातूर पातळी 364.25 मी, साठा 25.65 mm3, टक्केवारी 61.26. निर्गुणा प्रकल्प ता पातूर पातळी 386.70 मी., साठा 12.75 mm3, टक्केवारी 44.19. उमा प्रकल्प ता. मूर्तिजापूर पातळी 337.80 मी., साठा 0.536 mm3, टक्केवारी. 4.59. दगडपारवा प्रकल्प जलाशय पातळी -315.65 मीटर, उपयुक्त साठा 04.89 द.ल.घ.मी., टक्केवारी - 47.98,



## भोपळे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



**हिवरखेड :** येथील सहदेवराव भोपळे विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ७ वी) – २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम - पलक गोपाल रेखाते, द्वितीय - तेजस्विनी संतोष कनपटे, तृतीय - वेदिका रामदास येऊल, चतुर्थ - सौम्या स्नेहल भोपळे, पाचवा - मेघा अमोल कोल्हे तर सोनाक्षी विठ्ठल होपळ हिने सहावा क्रमांक मिळवीत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे, कार्यवाह श्यामशील भोपळे तसेच संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशाचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याचे विभाग प्रमुख तथा संस्था सहकार्यवाह स्नेहल भोपळे, मुख्याध्यापक संतोषकुमार राऊत आणि पर्यवेक्षक गणेश खानझोडे यांनी सांगितले. या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडली असून इतर विद्यार्थ्यांसाठीही हा प्रेरणादायी आदर्श ठरला आहे.

## टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर शाळा माजी विद्यार्थी संघाच्या वतीने वृक्षारोपण



**अकोला :** टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर शाळा माजी विद्यार्थी संघाच्या वतीने वृक्षारोपण & स्थानिक उमरी मोठी अकोला टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर शाळा येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृतिदिनानिमित्त व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दोन्ही महामानवाच्या पावन स्मृतीस स्मरून मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष दिगंबर वनारे , उमेश मसने, प्रकाश मालगण, सुनील भातुलकर, संजय पळसपगार, अरुण धनभर, शरद इंगोले, शैलेश ओळंबे, गजानन हातेकर, अमोल राऊळकर, प्रथमेश लोखंडे इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी संघाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## एमराल्ड टॉवरमध्ये साडेसहा लाखांची घरफोडी

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अकोला :** शहरातील तुकाराम चौक परिसरातील एमराल्ड टॉवर अपार्टमेंटमध्ये घडलेल्या लाखोंच्या घरफोडी प्रकरणाचा खदान पोलिसांनी पर्दाफाश करत आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांचे वितळवून तयार केलेले ४१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे लगड तसेच १ लाख ५० हजार रुपयांची रोकड, असा एकूण ६ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

खदान पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुधीर वसंतराव धंदवे (३६) रा. एगराल्ड टॉवर, तुकाराम चौक यांनी १ ऑगस्ट रोजी खदान पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार, ६ जुलै रोजी

त्यांच्या पत्नीने घरातील कपाटात ठेवलेल्या पर्समध्ये सुमारे ४१ ग्रॅम सोन्याचे दागिने व १ हजार ५०० रुपये रोख ठेवले होते. त्यामध्ये २७ ग्रॅमचे मंगळसूत्र, मुलीच्या नागकरण व वाढदिवसाला मिळालेले सोन्याचे दागिने, लॉकेट, कानातले अंगठ्या, चैन, ताकद, कारतूदो समावेश होता. दरम्यान, १६ जुलै ते १७ जुलै या कालावधीत अज्ञात व्यक्तीने घरातून हे सर्व दागिने व रोकड चोरून नेल्याचे उघड झाले. चोरीचा एकूण मुद्देगाल २ लाख ७७ हजार ५०० इतका होता.

तांत्रिक तपास, गुप्त माहिती आणि चौकशीच्या आधारे पोलिसांनी विनोद रमेश कोहर (४९) रा. एमराल्ड टॉवर, तुकाराम चौक, अकोला याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्याकडून चोरीतील दागिने वितळवून तयार केलेले ४१ ग्रॅम सोन्याचे लगड आणि १ लाख ५० हजार रुपयांची रोकड जप्त केली. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनात एपीआय नीलेश देशमुख, पीएसआय माजीद पठाण व पोलीस अंमलदार फिरोज, उमेश पराये, खुशाल नेमाडे, अभिषेक पाठक, इमरान यांनी केली. खदान पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) व ३०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वायफळ खर्च न करता विद्यार्थांना शालेय साहित्य वितरित



हिवरखेड : स्थानिक रहिवासी संतोष शर्मा यांनी जि. प. कन्या शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरित करून वाढदिवस साजरा केला.

दानशूर स्व. सुरजबाई शर्मा यांचे पुत्र आहेत. चिमुकल्या विद्यार्थ्यांना शालेय वस्तू पेन्सिल , खोडरबर, पाणी पिण्यासाठी बाटली अशा विविध वस्तूचे वितरण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक खिरोडकार, खडसे, आमले मॅडम, भोपळे मॅडम, घायल मॅडम, सामाजिक कार्यकर्ते चिंतामणराव खिरोडकार, प्रशांत भोपळे उपस्थित होते

## नवरात्री पूर्वी हावडा व कोल्हापूरला जोडणारी नवीन प्रवासी गाडी सुरु करा, विदर्भ यात्री संघाची मागणी

**अकोला :** नवरात्र पूर्वी हावडा व कोल्हापूर या दोन शक्तीपीठांना जोडणारी रेल्वे सुरू करा अशी मागणी विदर्भ यात्री संघाने रेल्वे मंत्री तसेच वरिष्ठांकडे केली आहे.

रेल्वे मंत्री अश्विनी कुमार वैष्णव, रेल्वे राज्य मंत्री वीरन्ना सोमन्ना व रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष तथा सीईओ सतीश कुमार, मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव व दक्षिण पूर्व रेल्वेचे महाप्रबंधक अनिल कुमार जैन, मंडल रेल प्रबंधक मध्य रेल्वे पुणे श्री राजेश कुमार वर्मा भुसावळचे श्री पुनीत अग्रवाल– आपण सर्वांना विनंती आहे की, भक्तांच्या सोयीसाठी दोन महत्त्वपूर्ण शक्तिपीठांना जोडणारी inहावडा कोल्हापूर नवीन प्रवासी




गाडी नवरात्री उत्सवाच्या अगोदर सुरू करावी. हावडा येथे मा कालीं माता हे शक्तिपीठ आहे व कोल्हापूर येथे मा महालक्ष्मी हे शक्तिपीठ आहे. या नवीन प्रवासी गाडीमुळे हावडा जवळ असलेले गंगासागर येथे जाणाऱ्या भक्तांना सुद्धा सोयीस्कर होईल .आज हावडा कोल्हापूर दरम्यान कोणतीच प्रवासी गाडी उपलब्ध नाही त्यामुळे प्रवाशांना बराच त्रास होतो. मागील काही वर्षापासून रेल्वे प्रशासन हे अनेक तीर्थक्षेत्रांना आपसात जोडण्याचे प्रयत्न करीत आहे या परंपरेला कायम ठेवून हावडा कोल्हापूर दरम्यान नवीन प्रवासी गाडी मार्गे बिलासपूर रायपूर नागपूर अकोला जळगाव पुणे सुरू करावी यामुळे गंगासागर ला जाणाऱ्या प्रवाशांना मोठी सुविधा होईल. तसेच अनेक तीर्थक्षेत्रांना आपसात जोडणारी 11403/11404 नागपूर–कोल्हापूर दरम्यान धावणारी ही द्विसाप्ताहिक गाडी दररोज करण्यात यावी.

यामुळे भक्तांना कोल्हापूरची देवी माँ महालक्ष्मी, तुलजापूरची माँ तुळजा भवानी (धाराशिव), पंढरपूरचे भगवान विठ्ठल–रुक्माई (कुर्डुवाडी), स्वामी समर्थ अक्कलकोट, बार्शी टाउन येथील भगवान विष्णूचे प्राचीन मंदिर, तसेच परळी वैजनाथ (बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक) येथे दर्शनासाठी जाण्या-येण्यात मोठी सोय होईल.

रेल्वे प्रशासन सध्या अशा सोयी-सुविधांकडे विशेष लक्ष देत आहे. फक्त एका गाडीचे फेरे वाढवल्यास इतक्या सर्व तीर्थक्षेत्रांमध्ये प्रवास करणे सोपे होईल. येणाऱ्या श्रावण महिना नवरात्र दसरा या सना अगोदर या शुभ प्रसंगी या गाडीचे फेरे वाढवून आपण भक्तांना सुविधा द्याल, अशी आपणाकडे नम्र विनंती आहे. या आशयाचे पत्रक विदर्भ यात्री संघचे अध्यक्ष डॉ. रवि के. आलिमचंदानी, अशोक अग्रवाल, दीप मनवाणी, ॲड. मिश्रा, डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ. गद्रे, डॉ. दुष्यंत, राजू अकोटकर मास्टर लवेश गोप पंजाबी आदींनी प्रसिद्ध केले आहे.

## गवताचार्य ह भ प सुशीलाबाई भुस्कट अनंतात विलीन



**अकोट :** अकोट मधील नंदीपेठ येथील भागवताचार्य हभप सुशीलाबाई चंद्रराव भुस्कट नंदिपेठ ज्येष्ठ कीर्तनकार यांचे शुक्रवार दि.२४ पहाटे अल्पशा आजाराने राहत्या घरी वयाच्या ८४ वर्षी निधन झाले. महाराष्ट्रात त्यांनी अनेक ठिकाणी भागवत कथा व कीर्तन सेवा केल्या १९५५ साली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या हस्ते त्यांचा सत्कार पार पडला होता, त्यांनी बालवयापासूनच अवघ्या ११ वर्षापासून पंढरीच्या पांडुरंगाची अखंड वारी केली.

## पेट्रोल टाकीमध्ये पेट्रोलसह पाणी, वाहन चालकांना होतो मनस्ताप

**अकोला :** गांधी रोडवरील अरिहंत मोबाईलचे संचालक मयुर राठी यांच्या मोटारसायकलच्या पेट्रोल टाकीमध्ये पेट्रोलसह पाणी निघाले. दोन दिवसांत पाऊस नाही. त्यामुळे हा प्रकार इथेनॉलचा असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. पेट्रोल पंपावर देखील राठी यांना असेच सांगितले. या प्रकारामुळे मयूर राठी यांना मनस्ताप सहन करावा लागला. टाकी ड्राय झाली होती असे ते म्हणाले.

वाहनांमध्ये इथेनॉलचे प्रमाण २० टक्के झाले आहे. पेट्रोल टँकचे रबर फाटले असेल किंवा टाकीमध्ये पाणी गेले असेल तर समस्या निर्माण होतात असे या विषयाचे तज्ञ राहुल राठी यांनी सांगितले. इथेनॉल आणि पेट्रोल मिक्स झाले तर त्याचे पाणी होते. त्यामुळे पेट्रोलपंप चालकांना दिवसात दोन तीन वेळा पाहणी करावी लागते. विशेष करून पावसाळ्यात ही समस्या प्रकर्षाने जाणवते असे त्यांनी सांगितले.

# 100 फुटाच्या नाल्याचे पाच फूट नालीत रूपांतर, न्यू महसूल कॉलनीतील रहिवासी समस्याग्रस्त

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

अकोला : महानगर पालिकेच्या हद्दवाढ भागातील खडकी बु. न्यू महसूल कॉलनी प्रभाग क्रमांक 20 मध्ये एका बिल्डरने 50 ते 100 फुटाचा नाला बुजवून टाकला. त्या बिल्डरच्या फ्लॅटचे जिथे बांधकाम सुरू आहे त्या ठिकाणी नाल्याचे बांधकाम केले आहे. महानगरपालिकेची परवानगी न घेता बांधकाम केल्यामुळे पावसाचे पाणी न्यू महसूल कॉलनीतील नागरिकांच्या घरासमोर जमा होऊन घरामध्ये शिरत आहे. या समस्येतून मार्ग काढावा अशी मागणी केली जात आहे.

शंभर फुटाच्या नाल्याचे पाच फुटाच्या नालीचे रूपांतर कोणाच्या आदेशानुसार केले व बेकायदेशीर बांधकाम करण्याची परवानगी कोणत्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी दिली या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणीचे निवेदन न्यू महसूल कॉलनीतील रहिवासी नागरिकांनी आयुक्तांना दिल्यावरही या प्रकरणाची साधी चौकशी सुद्धा प्रशासनातर्फे करण्यात आलेली नाही. या संदर्भात आज सकाळी महसूल कॉलनी परिसरात कॉलनीतील सर्व नागरिक एकत्र आले होते.



नागरिकांनी सविस्तर चर्चा केली. मोठ्या नाल्यात सापांचा वावर असून हे साप नागरिकांच्या घरात प्रवेश करून नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करत आहेत. परिसरातील नागरिकांनी अनेक वेळा सर्पमित्र बोलावून विषारी साप पकडून दिले. नाल्यातील सांडपाणी नागरिकांच्या घरासमोर जमा होत असल्यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तसेच अस्वच्छ पाण्यामुळे महसूल कॉलनी परिसरातील नागरिकांना डेंगू, मलेरिया होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महसूल कॉलनी परिसरात आरोग्य निरीक्षक मार्फत नियमित स्वच्छता होत नसल्यामुळे घाणीचे साम्राज्य कॉलनीमध्ये निर्माण झाले आहे. तसेच या परिसरात अस्वच्छ पाण्याचे डबके सुद्धा निर्माण झाल्यामुळे अकोला महानगरपालिकेच्या मलेरिया विभागामार्फत फवारणी करण्याची मागणी न्यू महसूल कॉलनी परिसरातील जागरूक नागरिकांनी केली आहे.

### नागरिकांच्या जीवाशी खेळू नका

या भागातील समस्यांकडे नागरिकांनी वारंवार लक्ष वेधून देखील महापालिका प्रशासन लक्ष देत नाही. त्यामुळे रहिवासी संताप व्यक्त करीत आहेत. नागरिकांच्या घरात साप निघत आहेत. त्यामुळे भीतीच्या सावटाखाली राहावे लागत आहे. समस्या तातडीने सोडवावी अशी मागणी केली जात आहे. सततचे दुर्लक्ष योग्य नाही असे रहिवाशांचे म्हणणे आहे. आज या भागातील रहिवासी एकत्र आले होते. त्यांनी महापालिका प्रशासनाने प्रश्न त्वरित सोडवा अशी मागणी केली.

# पहिल्या श्रावण सोमवारी श्री राजराजेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अकोला :** हिन्दी भाषिकांच्या श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी शहरातील सर्व शिवालयांमध्ये पहाटेपासूनच शिवभक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी पाहायला मिळाली. शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर मंदिरात यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पहाटे भगवान श्री राजराजेश्वर यांचा दुग्धाभिषेक व विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर दिवसभर रुद्राष्टाध्यायीच्या वेदमंत्रांचे अखंड पठण सुरू होते.

मंदिरात पाच वेळा महाआरती करण्यात आली. रात्री ९ वाजता पंचामृत, सुगंधी अत्तर व पवित्र जलाने भगवानांचे अभिषेक स्नान करून आकर्षक व मनमोहक श्रृंगार करण्यात आला.



### शेकडो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

हिंदी भाषिकांच्या पहिल्या श्रावण सोमवारी श्री राजराजेश्वर मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. शेकडो भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिर समितीच्या या उपक्रमाचे सगळ्यांनी तोंड भरून कौतुक केले.

श्रृंगार दर्शनासाठी शहरासह परिसरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविकांनी मंदिरात हजेरी लावली. उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची रांग कायम होती. संपूर्ण मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

# देशमुख महिला मंडळ अकोलाची मासिक सभा उत्साहात संपन्न

## महेश्वरी ग्रुपचे यशस्वी आयोजन



प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अकोला :** देशमुख महिला मंडळ अकोलाच्या जुलै महिन्याच्या मासिक सभेचे आयोजन महेश्वरी ग्रुप च्या वतीने करण्यात आले. यावेळी महेश्वरी ग्रुपने महेश्वरची पूर्ण माहिती दिली.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टीतून माहेश्वरी साडीचा जन्म झाला. 250 वर्षाचा इतिहास आपण अजूनही जपतो पुढेही आपण जपत राहावे. यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे. दीपप्रज्वलन व प्रतीमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी व्यासपीठावर मंडळाच्या अध्यक्षा राजश्रीताई , प्रमुख पाहुण्या माजी महापौर सौ. उज्वलाताई, ज्येष्ठ सल्लागार कविताताई, सचिव स्वप्नालीताई, कोषाध्यक्ष प्रतिभाताई, सहकोषाध्यक्ष सीमाताई, ग्रुप लीडर ज्योतीताई ह्या उपस्थित होत्या. तत्पश्चात पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांनी महिला सशक्तीकरणा बद्दल आपले मनोगत व्यक्त केले. तसेच अध्यक्षांनी झालेल्या व आगामी उपक्रमांची माहिती दिली.

आषाडी वारी निमित्ताने माहेश्वरी ग्रुपच्या सख्यांनी प्रथम विठू माऊलीला स्मरून टाळ मृदंगाच्या गजरात वातावरण भक्तीमय केले. आशा भोसलेंच्या अजरामर गीतांवर नृत्य प्रस्तुती करून त्यांना आदरांजली वाहिली .तसेच मनोरंजनात्मक गेम आणि हाउजी गेम घेण्यात आले. मेघा ,विभा, वैशाली ,दिपाली, संजीवनी, श्रद्धा, सोनल, दुसऱ्या गेम मध्ये विजेत्या विद्या, वर्षा ,प्रांजली, सीमा, केतकी, निशा, तिसऱ्या, गेम मध्ये संगीता ,रेवती शितल सुनीता छाया प्रगती पौर्णिमा, तर ड्रेस कोड मध्ये मनीषा अनुराधा ,संगीता, शितल यांनी बाजी मारली. दर महिन्यात मंडळाकडून सामाजिक उपक्रम राबविल्या जातो. त्यात महेश्वरी ग्रुपच्या वतीने राहीत गावातील गरजू वृध्द दाम्पत्याला दोन महिन्याचा आवश्यक किराणा सामान देण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन डॉ.अस्मिता यांनी केले तर आशा भोसलेंच्या अजरामर गीतांवर आधारित कार्यक्रमाचे संचालन सुलताताई यांनी केले. संध्याताईंनी आभारप्रदर्शन केले.

तसेच पूजा, अनुराधा यांनी हाऊजी गेमचे सूत्र सांभाळले. पाहुण्यांचा परिचय स्वाती यांनी करून दिला तर उपक्रमाची माहिती कल्याणी यांनी दिली. अरुणाताई, शालिनीताई, चंदाताई, सरोज, ताई अरुणाताई दि.,लताताई, माधुरीताई, विद्याताई, संगीताताई ,सुलताताई, नी ताताई, अनुराधाताई, स्वातीताई, अस्मिताताई, ज्योतीताई ,हर्षदा ताई, कल्याणी ताई , संध्याताई ,पूजाताई नभाताई वंदनाताई, यांनी उत्साहाने कार्यक्रमाचे नियोजन केले.

# वेळेवर हजेरीसोबत कामकाजाचीही तपासणी करा

## अन्यथा 'जीआर'चा उपयोग काय?

अनवर खान ३ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे, कामकाजात शिस्त आणि प्रशासनात गतिमानता यावी, यासाठी शासनाकडून वेळोवेळी विविध शासन निर्णय (जीआर) आणि आदेश जारी करण्यात येतात. नव्या शासन निर्णयाच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या अनधिकृत अनुपस्थितीला आळा घालण्यासाठी कठोर भूमिका घेण्यात आली असून, कर्तव्यावर गैरहजर राहणाऱ्यांवर नियमानुसार निलंबनाची कारवाई तसेच वेतनकपात करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शासकीय कार्यालयांतील उपस्थिती आणि कार्यालयीन शिस्तीला निश्चितच चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

मात्र, अधिकारी-कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित राहतात की नाही, याची तपासणी करण्याबरोबरच ते कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किती काम करतात, नागरिकांच्या अर्जांवर किती वेळेत कार्यवाही करतात आणि त्यांच्या टेबलवर प्रलंबित असलेल्या फायलींचा निपटारा किती प्रमाणात होतो, याचीही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियमित तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शासकीय कार्यालयात अधिकारी-कर्मचारी वेळेवर उपस्थित राहणे ही प्रशासनाच्या शिस्तीची पहिली पायरी आहे. मात्र, केवळ हजेरी ॲपवर उपस्थिती नोंदविणे किंवा बायोमेट्रिक मशीनवर हजेरी लावणे एवढ्यावरच प्रशासनाची कार्यक्षमता निश्चित होऊ शकत नाही. नागरिकांच्या कामांसाठी प्राप्त झालेले अर्ज, विविध प्रमाणपत्रांची प्रकरणे, परवानग्या, शासकीय योजनांशी संबंधित प्रस्ताव आणि इतर कार्यालयीन फायली यांचा विहित कालमर्यादेत निपटारा होणे तितकेच महत्त्वाचे आहे.

अनेकदा नागरिक एखाद्या कामासाठी शासकीय कार्यालयात अर्ज सादर करतात. त्यानंतर संबंधित फाईल एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फिरत राहते; मात्र प्रत्यक्ष निर्णय किंवा कार्यवाहीला विलंब होतो. परिणामी, नागरिकांना एकाच कामासाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात. काही प्रकरणांमध्ये तर अनेक आठवडे किंवा महिन्यांनंतरही काम पूर्ण होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागतो.

अधिकारी-कर्मचारी कार्यालयात वेळेवर उपस्थित नसतील तर त्यांच्यावर शासन निर्णयानुसार कारवाई होणे गरजेचे आहेच; परंतु कार्यालयात उपस्थित राहूनही नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होत नसतील, तर त्या विलंबाचीही जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. 'वेळेवर हजेरी' आणि 'वेळेवर काम' या दोन्ही बाबींना प्रशासनाने समान महत्त्व देणे आवश्यक आहे.

शासनाने अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या अनधिकृत गैरहजेरीवर कठोर कारवाईची भूमिका घेतली आहे. त्यामुळे कार्यालयीन शिस्त निर्माण होण्यास मदत होणार आहे. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी केवळ हजेरीपुरती मर्यादित न राहता प्रशासनाच्या एकूण कार्यक्षमतेशी जोडली जाणे आवश्यक आहे.

### प्रशासनाने याकडेही लक्ष द्यावे

**अकोला :** रस्ते अपघातांमधील मृत्यूचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी हेल्मेट सक्ती लागू करण्यात आली आहे. रस्त्यांवरील अतिक्रमण, रस्त्यांवर पार्किंग करण्यात येत असलेली वाहने, कर्णकर्कश हॉर्न असलेली वाहने, फटाक्यासारखा आवाज करणाऱ्या मोटारसायकल, मोकाट फिरणारी जनावरे, खड्डे पडलेले रस्ते, रस्त्याच्या बाजूला असलेल्या उघड्या नाल्या हे रस्ते अपघात घडण्यासाठी कारणीभूत आहेत.

## जामठी बु. ग्रामपंचायतीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

**मूर्तीजापूर :** जामठी बु. ग्रामपंचायत येथे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला माजी सभापती बाळासाहेब गुल्हाने, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष भैय्यासाहेब तायडे, नामदेवराव सावळे, संदीप तायडे, सदानंद बोळे, किशोर तायडे, विलास गुल्हाने, सागर सावळे, विकी सुरजुसे, दत्तू सावळे, नंदूभाऊ राऊत, सुखदेवराव चव्हाण, महेश



मिसळकर, अतुलभाऊ दहापुते, नरे पाटील, उमेश उमाळे तसेच मातंग समाज भाईचारा कमिटी व विदर्भ लहुजी क्रांती सेनेचे अध्यक्ष गजानन सुरेशराव गवई यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी सलाउद्दीन पठाण उपस्थित होते.

**प्रपत्र- १**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

पत्ता: कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
पाटबंधारे वसाहत, एम.एस.ई.बी. पावर हाऊस
समोर, गौरक्षण रोड, अकोला- ४४४००४

ई- मेल पत्ता: vidharbhahydrodiva@gmail.com दूरध्वनी क्रमांक: (०७२४)-२४५७९८३

**ई-निविदा सूचना क्र. ०८ सन २०२६-२०२७.**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग अकोला, हे अनुभवी सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ **http://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | कामाची अंदाजित किंमत | इसारा रक्कम | कोऱ्या निविदा दस्तावेजाची किंमत (नापरतावा) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिगाव प्रकल्प ता. नांदुरा जि. बुलढाणा येथे पुनर्वसित गावठणा जिगाव येथील प्लॉट मधून जाणाऱ्या ११ के व्ही उच्च दाब वीज वाहिनी स्थांनांतरित करण्याचे काम. | बुलढाणा | ३५६८२४५/- | ३५६८३/- | २३६०/- | ३ महीने |
| २ | वान धरण येथे जनित्र संचाचे पुरवठा, उभारणी व चाचणीचे काम. | अकोला | ३४५४३८७/- | ३४५४४/- | २३६०/- | ३ महीने |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक **०३.०८.२०२६** (११.०० वाजता) ते दिनांक **१०.०८.२०२६.** (१७.०० वाजता)
ई-निविदा उघडणे :- दिनांक **१२.०८.२०२६** (११.०० वाजता)
अ) परिशिष्ट क ५००/- रू. च्या स्टॅम्प पेपरवर भरून देणे आवश्यक आहे. ब) निधी उपलब्धतेनुसार कामाची देयके अदा केली जातील.
खालील ठिकाणी ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ- **http://mahatenders.gov.in** (सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.) २) कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला कार्यालयातील सूचना फलक.

**(अ.मो. डडमल)**
कार्यकारी अभियंता
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला

**विमाका/अम./जाहि/३८४/२०२६-२०२७**

# फ्रेंडशिप डे' निमित्त पुनर्रोपित 'जीवन' वटवृक्षाचा दहावा वाढदिवस उत्साहात

## वटवृक्षाशी मैत्रीचे अनोखे नाते जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अकोला :** फ्रेंडशिप डे चे औचित्य साधत पुनर्रोपित करण्यात आलेल्या जीवन या वटवृक्षाचा दहावा वाढदिवस रविवारी उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धन आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागात पार पडला.



दहा वर्षांपूर्वी वादळात उन्मळून पडलेल्या वटवृक्षाचे पुनर्रोपण आदर्श पार्क परिसरात वृक्षमित्र अजय गावंडे यांनी पुढाकार घेऊन केले होते. त्यानंतर या वृक्षाला जीवन असे नाव देण्यात आले. पुनर्रोपणाचा हा प्रयोग यशस्वी ठरल्यानंतर अशा अनेक वटवृक्षांना विविध ठिकाणी पुनर्रोपित करण्यात आले. उन्मळून पडलेल्या एका वृक्षाला पुन्हा उभे करून त्याला नवजीवन देण्याचा हा प्रयोग केवळ वृक्ष वाचविण्यापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यातून पर्यावरण संवर्धनाची एक सकारात्मक चळवळ निर्माण झाली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने वृक्षाला मैत्रीचा धागा बांधून, केक कापून आणि वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ घेऊन दहावा पुनर्रोपित वाढदिवस साजरा करण्यात आला. वृक्षाला राखी किंवा मैत्रीचा धागा बांधण्याच्या या अनोख्या उपक्रमातून माणूस आणि वृक्ष यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी वृक्षसंवर्धन हीच खरी पर्यावरण संरक्षणाची गुरुकिल्ली असल्याचे सांगत अशा उपक्रमांचा समाजात विस्तार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. उपस्थित सर्वांना यावेळी वृक्षसंवर्धनाची शपथ देण्यात आली. यावेळी अजय गावंडे, संजय भांगे, तुलसीदास खिरोडकार, मधुकर गायकवाड, इमरान सिद्दिकी, योगेश थोरात, दिनकर गायकवाड, मयूर जोशी, संतोष राठी, प्रा. सुधाकर चौधरी, पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, महिला, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी वृक्षसंवर्धनासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

"अकोला शहराचे वाढते तापमान लक्षात घेता वृक्षांची कत्तल थांबवून अधिकाधिक वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. केवळ वृक्ष लावून उपयोग नाही, तर त्यांचे संगोपन करून ते मोठे होईपर्यंत जपले पाहिजेत."

**अजय गावंडे**, वृक्षमित्र

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# पुसद वनवृत्तातील गैरव्यवहार प्रकरणी चौकशीचे आदेश

## आ. इंजी. किसन वानखेडे यांच्या तक्रारीची दखल : सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**महागाव :** पुसद वनवृत्तातील कथित गैरव्यवहाराच्या तक्रारीची महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना देण्यात आले आहेत.

महसूल व वन विभागाच्या मंत्रालय (विस्तार), मुंबई येथून अवर सचिव संजय जाधव यांनी दि. २४ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या पत्राद्वारे हे आदेश देण्यात आले आहेत.

आदेशानुसार, यवतमाळ वनवृत्ताचे उपवनसंरक्षक (प्रा.) डॉ. बी. एन. स्वामी यांच्याकडून पदाचा व अधिकाराचा कथित गैरवापर करून शासकीय निधीचा अपहार झाल्याचा आरोप तसेच विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४२११ संदर्भात दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याच्या तक्रारीची चौकशी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच संबंधित दोषी अधिकारी आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी व विभागीय कारवाई करण्याबाबतही तक्रारीत उल्लेख असल्याचे पत्रात नमूद आहे.

या आदेशात संदर्भ म्हणून किसनराव मारोती वानखेडे, आमदार, ८२ उमरखेड–महागाव विधानसभा मतदारसंघ दि. ८ जुलै २०२६ रोजी सादर केलेल्या तक्रार अर्जाचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच आमदारांनी वनमंत्र्यांना दि. ११ मे २०२६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर वनमंत्र्यांनी "उचित कार्यवाही करावी" असे निर्देश दिल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

शासनाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), नागपूर यांना तक्रारीतील सर्व मुद्द्यांची सखोल चौकशी करून स्वतःच्या अभिप्रायासह सात दिवसांच्या आत शासनाला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

या आदेशामुळे पुसद वनवृत्तातील कथित गैरव्यवहाराच्या प्रकरणाला महत्त्वाचे वळण मिळाले असून, चौकशी अहवालानंतर शासनाकडून पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

## कळंब येथे रस्त्यावरचे पाणी दुकानात शिरले

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**कळंब :** येथे सिमेंट रोड बांधताना नालीचे बांधकाम योग्यरीत्या करण्यात आले नाही. रस्ता क्रॉस असणाऱ्या नालीत व्यवस्थित पाईप टाकले गेले नाहीत. त्यामुळे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण झाला आहे. याचा त्रास कळंब येथील इंदिरा चौकातील व्यावसायिकांना मागील अनेक वर्षांपासून सहन करावा लागत आहे.

येथील इंदिरा चौकात पाच वर्षांपूर्वी सिमेंट नालीचे बांधकाम करण्यात आले. हे काम करताना पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी आवश्यक त्या योग्य उपाययोजना करण्यात आलेल्या नाही.

त्यामुळे पाऊस आल्यानंतर नालीचे पाणी रस्त्यावरून वाहणे सुरू होते. तेच सांडपाणी अनेकांच्या दुकानात शिरते. तीन दिवसांपूर्वी याचा मोठा फटका येथील संजय छल्लाणी, अजय छल्लाणी, शैलेश कारिया आदी व्यावसायिकांना बसला. त्यांच्या दुकानात पूर्ण पाणी साचले. धान्य, फर्निचर, किराणा साहित्याचे मोठे नुकसान झाले.

या सर्व प्रकाराला नगरपंचायत जबाबदार असल्याचा आरोप आहे. नगरपंचायतीने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त व्यावसायिकांनी केली.

# कपड्यांच्या दुकानाला भीषण आग



## १७ लाखांपर्यंतचे नुकसान, चौकशीची मागणी

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**पुसद :** शहरातील वसंतनगर परिसरातील खडसे मैदानाजवळील नफीज कलेक्शन या कपड्यांच्या दुकानाला ३१ जुलैच्या मध्यरात्री भीषण आग लागून अंदाजे १२ ते १७ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली. या प्रकरणी दुकानदार शेख शोएब शेख युसुफ (वय ३२) यांनी वसंतनगर पोलिसांकडे लेखी निवेदन देत घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, ३१ जुलै रोजी रात्री सुमारे १ ते १.३० वाजण्याच्या सुमारास दुकानाच्या मागील बाजूस असलेल्या राहत्या घरातील वीजपुरवठा अचानक खंडित झाला. त्यानंतर जाग आल्यावर शेख शोएब यांच्या निदर्शनास दुकानाला आग लागल्याचे आले. दुकानात मोठ्या प्रमाणात कपडे आणि ज्वलनशील साहित्य असल्याने आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचे प्रयत्न केले. या आगीत रेडीमेड कपडे, कपड्यांचे मटेरियल, लेगिन-टॉप, नकाब, महिलांच्या साड्या, फर्निचर, महत्त्वाची कागदपत्रे, बिले तसेच काऊंटरमधील रोकड जळून खाक झाली. त्यामुळे दुकानदाराचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आग नेमकी कशामुळे लागली, ती अपघाती होती की घातपाताचा प्रकार होता, याचा सखोल तपास करून सत्य समोर आणावे, अशी मागणी शेख शोएब यांनी केली आहे. तसेच संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशीही त्यांनी पोलिसांना विनंती केली आहे. या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार आणि नगर परिषद मुख्याधिकारी यांनाही देण्यात आल्या आहेत.

# विद्यार्थिनींनी निर्भय राहून अन्यायाविरुद्ध आवाज उठवा : API लक्ष्मी मलकुवार

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**उमरखेड :** महिलांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उद्देशाने गोपिकाबाई सीताराम गावंडे कनिष्ठ महाविद्यालयात मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. बालाजी लाभसेटवार होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उमरखेड पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) लक्ष्मी मलकुवार यांनी विद्यार्थिनींना महिला सुरक्षा, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, स्वसंरक्षण तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांची मदत कशी घ्यावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी निर्भयपणे शिक्षण घ्यावे आणि कोणत्याही प्रकारच्या अन्यायाविरुद्ध निःसंकोचपणे आवाज उठवावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक प्रा. साधना देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. योगिता मैद यांनी केले, तर आभार प्रा. हिंगोले यांनी मानले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्री, सखी, सावित्री समितीच्या अध्यक्षा प्रा. दिपाली हरण यांच्या नेतृत्वात प्रा. गायत्री व्यास, प्रा. भुतडा, प्रा. चव्हाण, प्रा. शितल जाधव आदी महिला प्राध्यापकांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल तुकाराम जंगवाड, पर्यवेक्षक प्रा. जी. बी. जाधव, विज्ञान शाखाप्रमुख प्रा. डी. एस. शिंदे, मॉडर्न पब्लिक स्कूल कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश शिंदे, प्रा. डॉ. शिरगिरे, प्रा. विनोद कनवाळे, प्रा. एन. डी. ठाकरे, प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. एस. के. बिचेवार, प्रा. पी. बी. देशमुख, प्रा. ए. व्ही. मोरे, प्रा. एस. पी. चिंचोलकर, प्रा. एस. एस. इंगळे, प्रा. साई काळे यांच्यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमातील मार्गदर्शनाचे उपस्थितांनी स्वागत करत अशा उपक्रमांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# गुलाम नबी आझ़ाद उर्दू अध्यापक विद्यालयात पुस्तक समीक्षा कार्यशाळा

## विद्यार्थी-शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**पुसद :** वाचनाची आवड जोपासणे, चिकित्सक विचारसरणी विकसित करणे आणि लेखनकौशल्याला चालना देण्याच्या उद्देशाने येथील गुलाम नबी आझ़ाद उर्दू अध्यापक विद्यालयात डी.एल.एड. विद्यार्थी-शिक्षकांसाठी पुस्तक समीक्षा लेखन कार्यशाळा व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थी-शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात आयोजित कार्यशाळेत प्रा. निसार अहमद खान यांनी पुस्तक समीक्षा लेखनाची संकल्पना स्पष्ट केली. प्रा. ताबिश अली यांनी पुस्तकाचे चिकित्सक मूल्यमापन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले, तर प्रा. इबान अहमद यांनी पात्रांचे विश्लेषण, भाषाशैली आणि साहित्यिक सौंदर्य ओळखण्याच्या पैलूंवर सविस्तर विवेचन केले. विद्यार्थी-शिक्षकांनी मार्गदर्शनाचा सक्रिय सहभागातून लाभ घेतला.

दुसऱ्या सत्रात पुस्तक समीक्षा स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी उर्दू आणि मराठी साहित्यातील विविध पुस्तकांवर अभ्यासपूर्ण व प्रभावी समीक्षा सादर केली. प्रा. खान हसनैन आकिब लिखित जदीद तालीमी रुजानात आणि Pedagogy of Teaching English यांसह सोचने की बातें, बुनियादी बातें आणि हिंदुस्तान आज़ादी के बाद या पुस्तकांचा अभ्यासासाठी समावेश करण्यात आला.



स्पर्धेत ज़ूबिया सदफ़, ज़ोहा मरयम, असीला तहरीम, अफ़शां फिरदौस, अबू ज़ैद, फ़ैज़ान, राफ़े, नौशीन ऐमन, अफ़ीफ़ा मरयम, फ़ाएक़ा कौनैन, अलवीरा ऐमन, मरयम, मिसबाह, आएशा, तहूरा, फ़रहत जहां, नुज़हत जहां, उमामा, हिना कौसर, ज़ैनब, सना परवीन आणि आशना फ़ातिमा यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य खान हसनैन आकिब होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. इबान अहमद आणि प्रा. ताबिश अली उपस्थित होते. "उत्तम शिक्षक घडण्यासाठी व्यापक वाचन आणि चिकित्सक विचारसरणी आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिव्यक्तीला नवी दिशा मिळते," असे प्रतिपादन प्राचार्य आकिब यांनी केले.

स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विद्यार्थी प्रतिनिधींनी केले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. गरज असल्यास याच वृत्ताला सकाळ, लोकमत किंवा महाराष्ट्र टाइम्स शैलीतही रूपांतर करून देऊ शकतो.

# वाहतूक उपशाखा बंद; उमरखेडची वाहतूक व्यवस्था पुन्हा रामभरोसे

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**उमरखेड :** शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काही वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेली वाहतूक उपशाखा जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार बंद करण्यात आली आहे. या निर्णयानंतर शहरातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून नागरिकांत आश्चर्य आणि नाराजी व्यक्त होत आहे.

वाहतूक उपशाखेत उपनिरीक्षकांसह स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यामुळे शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियंत्रण प्रभावीपणे केले जात होते. मात्र उपशाखा बंद झाल्यानंतर येथील कर्मचारी स्थानिक पोलीस ठाण्यात विलीन करण्यात आले असून त्यांच्या जागी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले नाहीत. या निर्णयाचा सर्वाधिक फटका शाळा, महाविद्यालय आणि शिकवणीसाठी ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे. शहरातील मुख्य चौक, बाजारपेठ आणि वर्दळीच्या रस्त्यांवर बेशिस्त पार्किंग, रस्त्यावर उभी राहणारी वाहने, हातगाडे, फेरीवाले आणि अतिक्रमण यामुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. वाहतूक पोलिसांची नियमित उपस्थिती नसल्याने अपघाताचा धोका वाढल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. उमरखेडमध्ये विविध शासकीय कार्यालये आणण्यासाठी सामाजिक संघटना सातत्याने प्रयत्न करत असताना, स्वतंत्र मनुष्यबळ असलेली वाहतूक उपशाखाच बंद करण्यात आल्याने शहराच्या वाढत्या वाहतुकीचे नियोजन कसे होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची संघटनात्मक बांधणी; चार प्रभारी जिल्हाप्रमुखांची नियुक्ती

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**यवतमाळ :** आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपंचायत निवडणुकांची तयारी सुरू असताना शिवसेनेने यवतमाळ जिल्ह्यात संघटनात्मक फेरबदल करत चार प्रभारी जिल्हाप्रमुखांची नियुक्ती केली आहे.

पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे आणि निवडणुकांच्या दृष्टीने कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे, हा या नियुक्तीमागील उद्देश असल्याचे पक्षाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.



नियुक्तीनुसार यशवंत पवार यांच्याकडे दिग्रस व पुसद विधानसभा, राजुदास जाधव यांच्याकडे आर्णी व उमरखेड विधानसभा, गजानन डोमाळे यांच्याकडे यवतमाळ व राळेगाव विधानसभा, तर आशीष खुलसंगे यांच्याकडे वणी विधानसभा मतदारसंघाची प्रभारी जिल्हाप्रमुख म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार आणि राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या पुढाकाराने या नियुक्त्या करण्यात आल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे. अलीकडील संघटनात्मक विस्तार आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पक्षबांधणीला गती देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

शिवसेना सचिव संजय पुष्पलता भाऊराव मोरे यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्रे जारी करण्यात आली असून, पक्षांतर्गत निवडणुका होईपर्यंत या नियुक्त्या लागू राहणार आहेत. जिल्ह्यातील इतर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि काही संघटनात्मक बदलही लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाने दिली आहे.

दरम्यान, पश्चिम विदर्भ सहसंपर्क प्रमुख पराग पिंगळे, जिल्हा संपर्क प्रमुख हरिहर लिंगनवार, श्रीधर (काका) मोहोड, जिल्हा संघटक साजिद शरीफ, विजय चोरडिया, जिल्हा समन्वयक संजय हातगावकर तसेच शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांनी नवनियुक्त प्रभारी जिल्हाप्रमुखांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# 'एक वही – एक पेन' उपक्रमातून स्पर्धा परीक्षार्थींना शैक्षणिक साहित्य

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**यवतमाळ :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले अभ्यासिका, यवतमाळ येथे 'एक वही – एक पेन' या सामाजिक उपक्रमांतर्गत स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत शिक्षणाला बळ देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महात्मा फुले अभ्यासिकेचे ग्रंथपाल मयूर राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच अभ्यासिकेतून विविध शासकीय सेवांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला. यावेळी ॲड. राहुल पाटील यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी, सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन आणि सामाजिक बांधिलकी याविषयी मार्गदर्शन केले. समाजाच्या सहकार्याने राबविण्यात येणारा 'एक वही - एक पेन' उपक्रम आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांसाठी मोठा आधार ठरत आहे.

# जनगणनेत धर्माच्या रकान्यात 'आदिवासी धर्म'ची नोंद करा

## राज्यस्तरीय परिषदेत ठराव

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**यवतमाळ :** अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, नवी दिल्ली आणि बिरसा क्रांती दल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २ ऑगस्ट) आर्णी रोडवरील बलवंत मंगल कार्यालयात राज्यस्तरीय आदिवासी धर्म चिंतन परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेत आगामी जनगणनेत धर्माच्या रकान्यात 'आदिवासी धर्म' अशी नोंद करण्याचे आवाहन करण्यात आले. यासंदर्भातील ठराव उपस्थितांनी हात वर करून सर्वानुमते मंजूर केला.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री शिवाजीराव मोघे होते, तर उद्घाटन माजी मंत्री तथा अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या राष्ट्रीय महिला अध्यक्षा गीताश्री उरांव यांच्या हस्ते झाले. यावेळी बिरसा क्रांती दलाचे संस्थापक दशरथ मडावी, माजी मंत्री प्रा. वसंतराव पुरके, मध्यप्रदेश आदिवासी काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रामू टेकाम, विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष रामसाहेब चव्हाण, बिरसा क्रांती दलाचे प्रदेशाध्यक्ष डी. बी. अंबुरे, राज्य समन्वयक जितेंद्र मोघे, महिला प्रदेशाध्यक्षा नंदिनी टारफे यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी व हजारो आदिवासी बांधव उपस्थित होते.

उद्घाटक गीताश्री उरांव यांनी आदिवासी समाजाची सांस्कृतिक आणि धार्मिक ओळख जपण्याची गरज अधोरेखित केली. आदिवासींची जीवनपद्धती, परंपरा आणि श्रद्धा या निसर्गाशी निगडित असल्याचे त्यांनी सांगितले.



प्रा. वसंतराव पुरके यांनी आदिवासी संस्कृती ही निसर्गकेंद्रित आणि शास्त्रशुद्ध असल्याचे मत व्यक्त केले, तर ॲड. रामू टेकाम यांनी आदिवासींची सांस्कृतिक अस्मिता टिकविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे नमूद केले.

दशरथ मडावी यांनी आपल्या भाषणात आदिवासी समाजाला स्वतंत्र धर्म कोड देण्याची मागणी अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याची गरज व्यक्त केली. जनगणनेत धर्माच्या रकान्यात 'आदिवासी धर्म' अशी नोंद झाल्यास समाजाची स्वतंत्र ओळख अधिक ठळक होईल, असे मत त्यांनी मांडले.

परिषदेत आदिवासी धर्म, संस्कृती, परंपरा, अस्मिता, संवैधानिक अधिकार आणि समाजासमोरील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आंतरराष्ट्रीय रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते पर्यावरण तज्ज्ञ व आदिवासी विचारवंत सोनम वांगचुक यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

दरम्यान, परिषदेतील काही वक्त्यांनी विविध सामाजिक, ऐतिहासिक आणि राजकीय संदर्भांवर आपापली मते व्यक्त केली. ही मते संबंधित वक्त्यांची असून, परिषदेत त्यावर चर्चा झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष शिवाजीराव मोघे यांनी आगामी जनगणनेत धर्माच्या रकान्यात 'आदिवासी धर्म' अशी नोंद करण्याचे आवाहन केले. त्यानंतर उपस्थितांनी सर्वानुमते ठराव मंजूर केला.

## भररस्त्यात पर्स हिसकावली

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**दिग्रस :** शहरात बाराभाई मोहल्ला परिसरात भाजीपाला घेऊन घरी जात असलेल्या महिलेच्या हातातील पर्स हिसकावून आरोपीने पळ काढला. ही घटना शनिवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला. आरोपी हा महिलेच्या घरी वीज मीटरचे रीडिंग घेण्यासाठी येत असल्याचे पुढे आले आहे. मयूर वाढवनकर (वय २२) रा. वारा जहांगीर ता. वाशिम असे त्याचे नाव आहे. संगीता किसन चव्हाण यांच्यासोबत ही घटना घडली. त्यांच्या पर्समध्ये १ हजार ७०० रुपये आणि ४०,००० रुपये किमतीचा मोबाइल फोन, असा एकूण ४१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल होता. तो इसम त्यांच्या घरी नियमितपणे विजेचे मीटर रीडिंग घेण्यासाठी येणारा मयूर वाढवनकर असल्याचे त्यांनी ओळखले.

**वि. अर्जुन भाउसाहेब जाधव, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) यांचे न्यायालय, पुसद**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : ८४/२०२६
मनकर्णाबाई + २ -वि- कोणीही नाही
**ने. ता. : ०३/०९/२०२६**

**:: जाहिरनामा ::**

**अर्जदार :-** १. श्रीमती मनकर्णाबाई प्रल्हाद पाईकराव, वय अं. ५९ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा. चिचोर्डी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली. २. दत्ता कामाजी मनवर, वय अं. ५१ वर्षे, व्यवसाय शेती -रा. शेंबाळपिंपरी, ता. पुसद, जि. यवतमाळ. ३. सै. मिना कैलास कांबळे, वय अं. ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा. आमदरी, ता. पुसद, जि. यवतमाळ. **-विरूध्द-**
**गैरअर्जदार :- कोणीही नाही.**

ज्याअर्थी, अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई मयत नामे गोदावरी कामाजी मनवर यांचा मृत्यु दिनांक १७/०८/२०२३ रोजी मौजा शेंबाळपिंपरी येथे झाला. सदर मृतकांच्या पश्चात अर्जदार यांच्या शिवाय कोणीही वारस नसल्याने सदरहू न्यायालयास अर्जदार यांनी मृतक गोदावरी कामाजी मनवर यांचे वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नं. ०८ सन १८८७ च्या कलम ८ अंतर्गत वारसा हक्क प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर प्रकरणातील अर्जदार सदरहू मृतक यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदास यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मृतक गोदावरी कामाजी मनवर यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८/०७/२०२६ रोजी सही व शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार,**
**स. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, पुसद**

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा दशक समर्पण कार्यक्रम

**अमरावती:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त "सेवा दशक समर्पण कार्यक्रमाचे आयोजन आज केले होते. या निमित्ताने दिव्यांग बांधवांना ई-बाईक वितरण व अंजनगाव सुर्जी नगर परिषद ला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत कचरागाडी वाटप होईल. राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्यासह भाजपा पदाधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.



# देश बरबाद करणाऱ्या षडयंत्राला मोदींनी उधळले!

## भाजप खासदार डॉ. अनिल बोंडे यांचा घणाघात; पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे केले कौतुक

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अमरावती :** नीट (NEET) परीक्षा आंदोलनाच्या नावाखाली दिल्लीत झालेल्या निदर्शनांमध्ये असामाजिक तत्वांनी घुसखोरी करून हिंसा भडकावण्याचा प्रयत्न केला. देशाला बरबाद करण्यासाठी भारत आणि भारताबाहेर एक मोठी टीम सक्रिय असून बांगलादेश अन् नेपाळसारखी अराजकता भारतात घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत हे आंतरराष्ट्रीय षड्यंत्र उधळवून लावले," असा थेट गंभीर आरोप भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केला आहे.

अमरावती येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा समर्पण दशक' कार्यक्रमात ते बोलत होते.

नीट' संदर्भात पंतप्रधान मोदींनी घेतला कठोर निर्णयभाषणादरम्यान नीट परीक्षेच्या मुद्द्यावर बोलताना डॉ. बोंडे म्हणाले, "कॉंग्रेसचे सरकार असते तर नीट पेपर फुटीचे प्रकरण दाबून टाकले गेले असते. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत कडक कायदा करून गुन्हेगारांवर कठोर कारवाई केली. २२ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेऊन एका महिन्याच्या आत विमानाने सुरक्षित पेपर आणून पुन्हा परीक्षा घेण्यात आली. आंदोलनादरम्यान काही जणांनी पंतप्रधानांवर राग व्यक्त केला, अभद्र शब्द वापरले; मात्र मोदींनी 'सर्व मुले माझीच आहेत' असे म्हणत सर्वांना माफ केले." डॉ. बोंडे पुढे म्हणाले, "२०१४ पासून २०२६ पर्यंत भारताला जगातील महासत्ता बनवण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या 'एकात्म मानवतावादाच्या' विचारांवर देश आणि राज्य सरकार चालत आहे. कलम ३७० रद्द झाल्यामुळे आज काश्मीरमध्ये तिरंगा फडकतोय. तर दुसरीकडे, महाराष्ट्रात मुख्यमंत्र्यांनी एका क्षणात शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करून मोठा दिलासा दिला आहे. जिल्ह्यात भाजप हाच सर्वात शक्तिशाली पक्ष आहे." या भव्य सोहळ्याला भाजप आमदार प्रवीण पोटे, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रताप अडसड, महापौर श्रीचंद तेजवानी, माजी आमदार रमेश बुंदिले, भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, तुषार भारतीय, निवेदिता चौधरी, चेतन गावंडे, किरण पातुरकर, शिवराय कुलकर्णी, दिनेश सूर्यवंशी, नितीन गुडधे, शिक्षक नेत्या संगीता शिंदे, नितीन धांडे, डॉ. वसुधा बोंडे, माजी सभापती विक्रम ठाकरे, अचलपूरच्या नगराध्यक्ष रुपाली माथने, शेंदूरजना घाटच्या नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे, वरुडचे ईश्वर सलामे, नगरसेविका डॉ. मधुरा काहाळे, डॉ. विलास कविटकर, चेतन पवार, बाळासाहेब हिंगणीकर प्रियंका मालठाने, अल्पसंख्यांक मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सलीम घानीवाले, नकुल सोनटक्के, यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### 'जेन झी' आणि 'जेन अल्फा'वर भाजपचा भर; मोर्चा वळवला

दिल्लीतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भाजपने आता तरुणांकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे. "विकसित भारत आणि समृद्ध महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी 'जेन झी' (Gen Z) आणि 'जेन अल्फा' (Gen Alpha) या नव्या पिढीला एकत्र आणावे लागेल. यावर्षीचे संपूर्ण वर्ष तरुणाईला समर्पित केले जाईल," अशी मोठी घोषणा डॉ. बोंडे यांनी केली. या कार्यक्रमात नीट परीक्षेसह विविध क्षेत्रात उत्कृष्ट यश मिळवणाऱ्या 'जेन झी' गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## किसान ब्रिगेडच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी इंजी. अनिकेत वाकपांजर, जिल्हा सचिवपदी प्रा. अनिरुद्ध होले

### विभागीय अध्यक्ष दिवाकरराव गावंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अमरावती :** शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी कार्यरत असलेल्या किसान ब्रिगेडच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्याच्या उद्देशाने अमरावती जिल्ह्याच्या नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे यांच्या नेतृत्वाखाली अमरावती जिल्हाध्यक्षपदी इंजी. अनिकेत पूर्णाजी वाकपांजर तर जिल्हा सचिवपदी प्रा. अनिरुद्ध सुधीरराव होले यांची नियुक्ती करण्यात आली.

नियुक्तीप्रसंगी किसान ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष दिवाकरराव गावंडे व राष्ट्रीय प्रवक्ते धनंजय मिश्रा यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी किसान ब्रिगेडची शेतकरी-केंद्रित भूमिका, संघटनेची आगामी वाटचाल तसेच राज्यभर संघटन विस्ताराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



नवनियुक्त जिल्हाध्यक्ष इंजी. अनिकेत पूर्णाजी वाकपांजर यांनी संघटनेने सोपविलेल्या जबाबदारीबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे, विभागीय अध्यक्ष दिवाकरराव गावंडे, राष्ट्रीय प्रवक्ते धनंजय मिश्रा तसेच किसान ब्रिगेडच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. अमरावती जिल्ह्यात संघटना गावागावांत सक्षमपणे उभी करून शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवक आणि ग्रामीण जनतेच्या विविध प्रश्नांवर प्रभावी लढा उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नवनियुक्त जिल्हा सचिव प्रा. अनिरुद्ध सुधीरराव होले यांनी किसान ब्रिगेडची ध्येय-धोरणे, विचार आणि शेतकरीहिताची भूमिका तळागाळातील प्रत्येक गावापर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रियपणे कार्य करण्याची ग्वाही दिली. युवकांना संघटनेशी जोडून जिल्ह्यात सक्षम व प्रभावी संघटन उभारण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

## राजापेठ पोलीसांनी सराईत गुन्हेगारांकडुन घरफोडीचे 3 गुन्हे उघड

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अमरावती:** राजापेठ पोलीसांनी सराईत गुन्हेगारांकडुन घरफोडीचे 3 गुन्हे उघड करण्यात आले.

फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहर येथे गुन्हा दाखल असून, सदर गुन्हाचे तपासात राजापेठ पोलीसांनी आरोपी तेजस गणवीर पंडीत वय २२ वर्ष रा. नगीना मस्जीद जवळ फ्रेजरपुरा अमरावती, क ०२ संकेत रामदास धोटे वय १९ वर्ष रा. झाडीपुरा नेरपरसोपंत जि. यवतमाळ यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, सदर गुन्हा केल्याची कबुली दिली असुन, आरोपी यास आणखी विचारपुस केली असता, आरोपी तेजस गणवीर पंडीत यांने काही दिवसापुर्वी राजापेठ पोलीस स्टेशन हददीतील मनभरी फुड मार्ट बडनेरा रोड जय दुर्गा किरणा राजापेठ कॉसिंग जवळ अमरावती घरफोडी केल्याची कबुली दिली असता, पोलीस स्टेशन राजापेठ अभिलेखावरील दाखल गुन्हा नुसार नमुद घरफोडी केल्याची कबुली आरोपी याने दिली आहे.



अटक करण्यात आलेले आरोपीचे नाव तेजस गणवीर पंडीत वय २२ वर्ष रा. नगीना मस्जीद जवळ फ्रेजरपुरा अमरावती,संकेत रामदास थोटे वय १९ वर्ष रा. झाडीपुरा नेरपरसोपंत जि. यवतमाळ असे असून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मध्ये नमुद ३ गुन्हातील घटनास्थळावरुन चोरी केलेले २०,००० रुपये रोख

सदर कार्यवाही ही राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे पोलीस उपायुक्, संजय खताळे सहायक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग अम.श. याचे मार्गदर्शनाखाली पोस्टे राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात पोनि उमेश मुंढे (गुन्हे) सपोनी नितीन शिंदे, पोलीस अंमलदार, मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खटे रवि लिखीतकर, शशीकांत शेळके, अंकुश काळे, प्रशांत बेलोकर, आकाश यादव, अंकुश काळे, अमोल खंडेझोड, रफीक खान, पंकज गाठे, अमोल देशमुख, अर्जुन कदम कामगिरी केली आहे.

## 23 दिवसांनी कबरीतून युवकाचा मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन

### इन्स्टाग्राम चॅटिंगमधून युवतीशी संपर्क उघड; वडिलांच्या तक्रारीनंतर पोलिसांची कारवाई



प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**धारणी:** धारणी तालुक्यातील लवादा येथील १९ वर्षीय युवकाच्या संशयास्पद मृत्यूने खळबळ उडाली आहे. प्रेम संबंधातून हत्या झाल्याचा संशय व्यक्त करत मृताच्या वडिलांनी पोलिसांत तक्रार दिल्यानंतर तब्बल २३ दिवसांपूर्वी दफन केलेला मृतदेह कबरीतून बाहेर काढून घटनास्थळीच शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून पोलिसांनी सर्व बाजूंनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लवादा येथील आशीषकुमार उर्फ भय्यू परशुराम भिलावेकर (वय १९) हा ४ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजता आजी-आजोबांच्या घरी झोपण्यासाठी जात असल्याचे आई लीला भिलावेकर यांना सांगून घराबाहेर पडला होता. मात्र रात्री सुमारे २ वाजता गावातील जाजू बालाजी भिलावेकर यांनी वडील परशुराम भिलावेकर यांना आशीष बेशुद्ध अवस्थेत पडल्याची माहिती दिली. कुटुंबीयांनी त्याला प्रथम गावातील एका वैद्याकडे नेले. त्यानंतर तत्काळ धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृतदेहावर कोणत्याही प्रकारच्या मारहाणीच्या खुणा नसल्याने तसेच त्या वेळी वडिलांनी शवविच्छेदनास नकार दिल्याने ५ जुलै रोजी शेतातच मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

> "मृतदेह कबरीतून बाहेर काढून शवविच्छेदन करण्यात आले आहे. सध्या आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृताच्या वडिलांची तक्रार प्राप्त झाली असून वैद्यकीय (शवविच्छेदन) अहवाल आल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल."
>
> - अवतारसिंह चौहान
> पोलीस निरीक्षक, धारणी

दरम्यान, काही दिवसांनी मृताची बहीण आराधना राकेश दहीकर हिने आशीषचा मोबाईल तपासला असता इन्स्टाग्रामवर गावातीलच एका युवतीशी सातत्याने चॅटिंग झाल्याचे आढळून आले. मित्रांकडून चौकशी केल्यानंतर दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर वडील परशुराम भिलावेकर यांनी मुलाची हत्या झाल्याचा संशय व्यक्त करत धारणी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार देऊन सखोल चौकशीची मागणी केली.

तक्रारीची गंभीर दखल घेत धारणी पोलिसांनी २८ जुलै रोजी महसूल व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कबरीतून मृतदेह बाहेर काढला. घटनास्थळीच शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

## अकोली अंडरपासच्या कायमस्वरूपी समस्येवर ROB उभारण्याची मागणी

### राज्यसभा सदस्य खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या माध्यमातून रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील साईनगर प्रभागातील अकोली अंडरपासमध्ये प्रत्येक पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येवर तात्पुरते उपाय न करता कायमस्वरूपी तोडगा म्हणून रेल्वे ओव्हर ब्रिज (ROB) उभारण्यात यावा, अशी मागणी अमरावती महानगरपालिकेचे सभागृह नेता चेतन विजयराव गावंडे यांनी केली आहे. या संदर्भात राज्यसभा सदस्य खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या माध्यमातून केंद्रीय रेल्वेमंत्री मा. अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन अकोली अंडरपासच्या ठिकाणी ROB मंजूर करण्यासाठी शिष्टमंडळामार्फत निवेदन सादर करण्यात येणार आहे.



चेतन गावंडे म्हणाले की, अकोली अंडरपासमध्ये पावसाचे पाणी साचल्यामुळे वाहतूक विस्कळीत होते. विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यास, नागरिकांना दैनंदिन कामकाजासाठी तसेच रुग्णवाहिका व इतर आपत्कालीन सेवांना मोठा अडथळा निर्माण होतो. त्यामुळे या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून ROB उभारणे अत्यावश्यक आहे. या प्रश्नाची गंभीरता लक्षात घेऊन आपण सातत्याने प्रशासनाचे लक्ष वेधले असून, आता केंद्र शासनाच्या माध्यमातून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे. ROB उभारल्यास अकोली परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित, सुरळीत आणि अखंडित होईल तसेच पावसाळ्यात नागरिकांना होणाऱ्या त्रासातून कायमस्वरूपी दिलासा मिळेल. यावेळी आमदार मा. प्रवीण पोटे-पाटील, भाजप नेते तुषार भारतीय, नगरसेवक ॲड. प्रशांत देशपांडे, बंडू हिवसे, चेतन पवार आदींची उपस्थिती होती. या सर्वांच्या समावेश असलेल्या शिष्टमंडळाने राज्यसभा सदस्य खासदार डॉ. अनिल बोंडे यांची भेट घेऊन रेल्वेमंत्री मा. अश्विनी वैष्णव यांच्याकडे अकोली अंडरपासच्या ठिकाणी ROB मंजूर करण्यासाठी प्रभावी पाठपुरावा करण्याची विनंती केली.

## दर्यापुरात पोलिसांनी तपासले सीसीटीव्ही फुटेज



**दर्यापूर:** दर्यापुरातील माहोरे ज्वेलर्स येथे बंदुकीचा धाक दाखवून सोने लुटणाऱ्या टोळीचा शोध घेण्यासाठी दर्यापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी, दर्यापूरचे ठाणेदार अजित राठोड यांनी शहरातील ज्या भागातून आरोपीच्या कारने पळ काढला. मुख्य रस्त्यावरचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेज अंदाजे 150 चे 200 ठिकाणचे तपासणी सुरू आहे. ग्रामीण गुन्हे शाखेची पथकही आरोपीच्या मागावर आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम हे सुद्धा बारकीने घटनेवर लक्ष ठेवून आहेत. श्वान पथक, व ठसेतज्ञ त्यांची भूमिका या चोरीचा शोध घेण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

## 'इकोफ्रेंड्स' पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक सक्षमपणे राबवतील- प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे

### यमराजाने समाजाला दिली समज; पथनाट्यातून विद्यार्थ्यांचा प्रभावी संदेश

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**अमरावती :** विदर्भातील नामांकित आणि अमरावती शहरातील शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील वनस्पतीशास्त्र विभागाच्या 'इकोफ्रेंड्स' या विस्तारसेवा उपक्रमांतर्गत तसेच महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १ ऑगस्ट २०२६) वृक्षदिंडी आयोजित करण्यात आली. या दिंडीचे उद्घाटन सामाजिक वनीकरण विभागाचे वनक्षेत्रपाल संतोष धापड यांच्या हस्ते करण्यात आले.



वृक्षदिंडीदरम्यान परिसरातील विविध शाळा व महाविद्यालयांना भेटी देण्यात आल्या. प्रत्येक संस्थेला पाच वृक्षांची रोपे भेट देऊन त्यांचे पालकत्व स्वीकारण्याचे आणि त्यांच्या संवर्धनाची सामूहिक जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दिंडीदरम्यान यमराजाच्या भूमिकेवर आधारित प्रभावी पथनाट्य, आकर्षक लेझीम सादरीकरण तसेच पर्यावरणविषयक संदेश देणारे अभंगगायन सादर केले. या माध्यमातून वृक्षारोपणाचे महत्त्व, वृक्षसंवर्धनाची गरज, पर्यावरणासमोरील सध्याची आव्हाने आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने स्वीकारावयाची जबाबदारी याबाबत जनजागृती करण्यात आली.

या वृक्षदिंडीस श्री गणेशदास राठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, श्री शिवाजी बहुउद्देशीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गाडगेनगर), श्री केशरबाई लाहोटी महाविद्यालय, श्री पंजाबराव देशमुख जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, श्री पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय तसेच श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथील विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. दिनेश खेडकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संगीता इंगोले, 'इकोफ्रेंड्स' समन्वयक डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. गणेश हेडाऊ, डॉ. रेखा मग्गिरवार, डॉ. स्वाती पुंडकर, डॉ. अंकित काळे आणि 'इकोफ्रेंड्स' व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

### "वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे"

"पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. या वृक्षदिंडीमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयीची जाणीव अधिक दृढ झाली असून 'इकोफ्रेंड्स'च्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाची चळवळ आणखी व्यापक आणि प्रभावीपणे राबविण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून हरित, समृद्ध आणि शाश्वत भारताचे स्वप्न निश्चितच साकार होईल."

- **डॉ. जी. व्ही. कोरपे,** प्राचार्य

### "निसर्ग वाचविण्याची जबाबदारी आता आमची"

"स्वस्थ, सुरक्षित आणि समृद्ध भविष्य घडवायचे असेल तर पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी आम्ही युवकांनीच स्वीकारली पाहिजे. निसर्गाच्या विरोधात कोणतेही विकासकार्य शाश्वत ठरू शकत नाही. त्यामुळे पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक युवकाने 'इकोफ्रेंड' बनून कार्य करण्याचा संकल्प करावा. आम्ही ही जबाबदारी स्वीकारून हरित भविष्यासाठी काम करण्याचा निर्धार केला आहे."

- **यश ठोकळ,** अध्यक्ष, 'इकोफ्रेंड्स'

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






# गुटखा आणि वाहन असा ९ लाख ७४ हजारांचा मुद्देमाल जप्त...

सिटी न्युज सुपरफास्टचा दणका...

# गुटखा तस्करी पुन्हा पुन्हा, तापडियावर दाखल झाला गुन्हा !

***पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन झाले दक्ष *मोक्का अंतर्गत कारवाई होणार का याकडे लागले लक्ष**

● नाजीर शेख @ वाशीम ●

वाशिम ग्रामीण पोलिसांनी १ ऑगस्ट रोजी अवैध गुटखा वाहतुकीविरोधात कारवाई करत प्रतिबंधित गुटखा आणि वाहनासह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. मात्र अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी वाशिम मध्ये नसल्याने गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. त्यामुळे वाहन चालक याला समज पत्र देऊन सोडण्यात आले होते.तर दुसरीकडे या संबंधित मुख्य गुटखा तस्कराचे नाव आर्थिक देवाण घेवाण करून कारवाईतुन दडपल्याची चर्चा सुरू होती.या संदर्भात दै. सिटीन्युज सुपरफास्टने वृत्त प्रसारीत करून मुख्य गुटखा तस्कर 'तापडिया'चा नाव पर्दाफाश केले होते .अखेर या बातमीची दखल घेत अन्न व औषध










प्रशासन अधिकारींच्या फिर्यादीवरून या प्रकरणी मुख्य गुटखा तस्कर आरोपी विजय तापडिया आणि वाहन चालक रुपेश ताराचंद पवार दोन्ही रा. रिसोड जि ,वाशिम यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

दि. १ ऑगस्ट शनिवार रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वाशिम ग्रामीण पोलिसांकडून वाशिम-रिसोड मार्गावरील जांभरुण-नावजी बायपास उड्डाणपुलाजवळ नाकाबंदी करण्यात आली. संशयास्पद महिंद्रा सुप्रो मालवाहू वाहन थांबवून तपासणी करण्यात आली. वाहनातील मालाबाबत चालकाकडून समाधानकारक माहिती न दिल्याने पंचांसमक्ष वाहनाची झडती घेतली असता,त्या वाहनामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विविध कंपन्यांचा गुटखा आढळून आला.सदर माल जप्त करून पोलीस ठाण्यात सीलबंद ठेवण्यात होता.मात्र अन्न व औषध प्रशासन अधिकारी वाशिम मध्ये हजर नसल्याने वाहन चालक याला समजपत्र देऊन सोडण्यात आले होते.तसेच या प्रकरणातील मुख्य गुटखा तस्कर 'तापडिया' याचे नाव समोर येवू नये यासाठी मोठी आर्थिक देवाण घेवाण करून त्याला सोडण्यात आले अशी चर्चा सुरू होती.

या संदर्भात २ ऑगस्ट रोजी दै. सिटीन्युज सुपरफास्टने वाशिम ग्रामीण पोलिसांच्या कारवाईत,अवैध गुटखा , वाहन चालकाला फटका, मुख्य सूत्रधाराची सुटका या मथळ्याखाली वृत्त प्रसारित केल्याने पोलीस विभाग आणि अन्न व औषध प्रशासन विभागात एकच खळबळ उडाली.अन् सोमवारी हजर होणारे अन्न व औषध प्रशासन अधिकारी २ ऑगस्ट रविवार रोजीच ग्रामीण पोलीस ठाण्यात धडकले. दरम्यान जप्त केलेल्या मुद्देमालाचा पंचनामा करण्यात आला.अन्न व औषध प्रशासनाच्या पंचनाम्यानुसार जप्त गुटख्याची किंमत ५ लाख ७४ हजार ९३० रुपये असून वाहनाची किंमत ४ लाख रुपये आहे. अशा प्रकारे एकूण ९ लाख ७४ हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन अधिकारी राठोड यांच्या फिर्यादीवरून अखेर मुख्य गुटखा तस्कर विजय तापडिया आणि चालक रुपेश ताराचंद पवार यांच्याविरुद्ध वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमाअनव्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यासाठी एक पथक रात्री उशिरा रिसोड कडे रवाना करण्यात आले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल गंधे करीत आहेत.ही कारवाई ठाणेदार श्रीदेवी पाटील, पोलीस कर्मचारी निलेश घुगे, प्रवीण राऊत, संतोष शेनकुडे, शिवचरण घुगे, दीपक भडांगे तसेच अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी राठोड यांनी केली.

## गुटखा तस्कर तापडियावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी !

रिसोड हे प्रतिबंधित गुटख्याचे हब बनले असून सध्या येथूनच संपूर्ण वाशिम जिल्ह्यात गुटखा पुरवठा केला जात आहे. मात्र याकडे पोलिसांचे आणि अन्न व औषध प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याने हा व्यवसाय मोठया प्रमाणात सुरूच आहे. याआधी वाशिम स्थानिक गुन्हे शाखेने या तापडियाचा १ कोटी रुपयांचा गुटखा जप्त करून कारवाई केली होती. मात्र तरी देखील कोणाला न जुमानता संपूर्ण जिल्ह्यात गुटखा पुरवठा करत आहे. त्यामुळे आरोपी विजय तापडियावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे .

## थोडक्यात

### ग्रंथालयात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य प्रदर्शन आयोजन



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लेखन प्रेरणा दिन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, वाशिम येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्हा ग्रंथालयात अण्णाभाऊ साठे यांच्या विविध साहित्यकृतींचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

या साहित्य प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी महेंद्र ताजने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा सामाजिक परिवर्तन, समता आणि लोकजागृतीसाठी असलेला मोठा प्रभाव अधोरेखित करत त्यांच्या साहित्याचा अभ्यास करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास विद्यार्थी, वाचकवर्ग तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. प्रदर्शनामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या, कथासंग्रह, पोवाडे, लोकनाट्ये आणि इतर साहित्यकृतींचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले आहे. हे साहित्य प्रदर्शन वाचकांसाठी आठवडाभर खुले राहणार असून, विद्यार्थी, साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांनी तात्काळ आधार प्रमाणीकरण करावे

**वाशीम:** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ अंतर्गत जिल्ह्यातील ६९४ गावांतील सेवा सहकारी संस्था (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक) तसेच राष्ट्रीयकृत, ग्रामीण व खासगी बँकांमधील ५४ हजार १०७ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यापैकी ३५ हजार ४२९ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून १८ हजार ६७८ शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे उर्वरित पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक लटपटे यांनी केले आहे.

## अप्पर तहसीलसाठी केनवडच योग्य... केनवडसह परिसरातील नागरिकांना होणार मोठा फायदा !

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

प्रशासन नागरिकांच्या दारी पोहोचावे, महसूल कामांसाठी होणारी धावपळ थांबावी आणि केनवडसह परिसरातील गावांना जवळच शासकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच असणे गरजेचे आहे. केनवड हे परिसराच्या दृष्टीने सोयीचे व महत्त्वाचे केंद्र असल्याने अप्पर तहसीलचा फायदा केवळ एका गावाला नव्हे, तर संपूर्ण परिसराला होणार आहे, अशी भूमिका केनवडच्या सरपंच नीतातई गोळे यांनी मांडली आहे.

रिसोड तालुक्यात प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयासाठी केनवड हे नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे ठिकाण असून, येथे कार्यालय सुरू झाल्यास परिसरातील अनेक गावांतील नागरिकांना त्याचा थेट फायदा होणार असल्याचे गोळे यांनी म्हटले आहे.नागरिकांना महसूल प्रशासनाच्या विविध कामांसाठी तालुका मुख्यालयापर्यंत वारंवार



सरपंच नीतातई गोळे केनवड

जावे लागू नये, प्रशासनाचे विकेंद्रीकरण व्हावे आणि शासकीय सेवा नागरिकांच्या अधिक जवळ उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने अतिरिक्त तहसील कार्यालयांची संकल्पना पुढे आली आहे. शासनाच्या प्रस्तावित अतिरिक्त तहसील कार्यालयांच्या यादीत 'रिसोड–केनवड' असा उल्लेख झाल्याने केनवडचे प्रशासकीय महत्त्व अधोरेखित झाले आहे.केनवड हे परिसरातील अनेक गावांसाठी दळणवळण आणि दैनंदिन व्यवहाराच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. परिसरातील नागरिकांचा विविध कामांसाठी केनवडशी नियमित संपर्क असतो. त्यामुळे येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित झाल्यास महसूलविषयक कामांसाठी नागरिकांना होणारी धावपळ कमी होऊन वेळ आणि खर्चाची बचत होण्यास मदत होईल. अतिरिक्त तहसील कार्यालयाचे ठिकाण निश्चित करताना नागरिकांची सोय, प्रशासकीय गरज, भौगोलिक स्थिती, दळणवळणाची उपलब्धता आणि परिसरातील गावांना होणारा फायदा या बाबींना प्राधान्य देणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता केनवड हे अप्पर तहसील कार्यालयासाठी योग्य ठिकाण असल्याची भूमिका सरपंच गोळे यांनी मांडली.दरम्यान, केनवड येथे प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय कायम ठेवण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या उपोषणस्थळी मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांनी भेट दिली.'केनवड येथे अप्पर तहसील कार्यालय झाल्यास त्याचा फायदा केवळ केनवड गावालाच नव्हे, तर परिसरातील अनेक गावांतील शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना होईल. महसूल प्रशासन नागरिकांच्या जवळ येईल आणि विविध कामांसाठी होणारा वेळ व खर्च वाचेल. त्यामुळे प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच कायम ठेवणे परिसराच्या हिताचे आहे,' असे सरपंच नीतातई गोळे यांनी सांगितले.




## मध्यस्थीद्वारे वाद मिटविणे हा जलद, सुलभ आणि विश्वासार्ह पर्याय !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

न्यायालयीन वादांचा तणाव कमी करून परस्पर सामंजस्यातून वाद मिटविण्यासाठी मध्यस्थी ही प्रभावी, जलद आणि विश्वासार्ह प्रक्रिया असून, मध्यस्थाने तटस्थ भूमिका निभावत पक्षकारांमध्ये संवाद घडवून आणणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम् यांनी केले.

जिल्हा व सत्र न्यायालयातील कक्ष क्रमांक १३ येथे आयोजित 'मध्यस्थी जनजागृती' कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. ए. एस. बाकलीवाल, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. ए. आर. व्यवहारे, जिल्हा



न्यायाधीश-१ जे. पी. झपाटे, जिल्हा न्यायाधीश-२ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. डी. इंगळे तसेच वाशिम मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी उपस्थित होते. त्यांनी मध्यस्थीद्वारे दोन्ही पक्षांच्या संमतीने समाधानकारक तोडगा निघत असल्याने ही प्रक्रिया अधिक परिणामकारक ठरत असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. डी. डी. गुडदे यांनी केले, तर मुख्यन्यायरक्षक परमेश्वर आ. शेळके यांनी आभार मानले.

## लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करा !

***राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांचे निर्देश * सेवा वितरणात वाशीम राज्यात पाचव्या क्रमांकावर**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शासनाच्या अधिसूचित सेवा नागरिकांना पारदर्शक, कार्यक्षम व विहित कालमर्यादेत उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिकांना वेळेत सेवा देऊन कोणत्याही प्रकारची दिरंगाई टाळावी, तसेच प्रत्येक अधिकाऱ्याने आपले उत्तरदायित्व ओळखून लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश अमरावती विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात लोकसेवा हक्क अधिनियमाच्या




वाशिम जिल्ह्यातील अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांच्यासह विविध विभागांचे यंत्रणाप्रमुख उपस्थित होते. असे निर्देशही त्यांनी दिले. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सांगितले की, लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असून, नागरिकांना विहित कालमर्यादेत गुणवत्तापूर्ण सेवा मिळाव्यात यासाठी सर्व विभागांचा नियमित आढावा घेतला जात आहे. प्रलंबित प्रकरणे कमी करून सेवा वितरण अधिक परिणामकारक करण्यावर भर देण्यात येत आहे.जिल्हा प्रकल्प प्रमुख सौरभ जैन यांनी सादर केलेल्या माहितीनुसार, २८ जुलै २०२६ पर्यंत लोकसेवा हक्क अधिनियमाच्या डॅशबोर्डवर जिल्ह्यातील २७ विभागांमध्ये एकूण १ लाख २४ हजार ३४९ अर्ज प्राप्त झाले असून १ लाख २१ हजार ३९९ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. कालमर्यादेत सेवा देण्याचे प्रमाण ९४.३२ टक्के आहे. जिल्ह्यात विविध विभागांमार्फत नागरिकांसाठी एकूण ५६५ सेवा उपलब्ध आहेत. आपले सरकार सेवा केंद्रांच्या जुलै २०२६ च्या अहवालानुसार जिल्ह्यात ७७० आपले सरकार सेवा केंद्रे कार्यरत असून नागरिकांनी शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रांचा उपयोग करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## विठ्ठल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी संजय बाजड

### विज्ञान शिक्षक ते प्राचार्य - एक अनुभवी आणि प्रेरणादायी प्रवास...

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील पार्डी आसरा येथील प्रतिष्ठित विठ्ठल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी संजय बाजड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेली ३० वर्षे विद्यान शिक्षक म्हणून अविरत सेवा बजावणाऱ्या बाजड सरांचा शिक्षक ते प्राचार्य असा प्रेरणादायी प्रवास आहे.



विज्ञान शिक्षक म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात करणारे संजय बाजड एक विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून संस्थेत नावारूपास आले. मेहनत, शिस्तप्रिय आणि कर्तव्यप्रती असलेली निष्ठा असा त्यांचा प्रेरणादायी प्रवास आहे. गेली ३० वर्षांपासून ते संस्थेचा नावलौकिक आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अविरत कार्यरत आहेत. त्यांचा हा प्रदीर्घ अनुभव लक्षात घेऊन संस्थेने बाजड सर यांच्या खांद्यावर प्राचार्यपदाची धुरा टाकली आहे. ' विद्यार्थी हाच केंद्रबिंदू ' या विचाराने काम करणारे संजय बाजड यांच्याकडून संस्थेला आणि विद्यार्थ्यांना मोठ्या अपेक्षा आहेत. त्यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली विद्यालय आणखी प्रगती करेल असा विश्वास पालक आणि शिक्षक वर्गातून व्यक्त होत आहे. संजय बाजड यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, सहकारी शिक्षक, विद्यार्थी आणि रिसोड - मालेगाव तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गेल्या ३० वर्षांपासून वाशिम शहरात वास्तव्यास असलेला बाजड परिवार सेवाभावी आणि सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. बाजड सर यांच्या सहचारिणी सौ. संजीवनीताई बाजड या जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून राज्यस्तरावर काम करत आहेत. महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरू असतात त्यामुळे आपसुकच हा परिवार संपूर्ण विदर्भात सुपरिचित आहे. त्यामुळे सर्वच स्तरातून नवनियुक्त प्राचार्य संजय बाजड यांचे अभिनंदन होत आहे.

### बाजड सर यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा

विज्ञान प्रदर्शन आणि विज्ञान अध्यापक मंडळाच्या माध्यमातून विविध उपक्रमात सक्रिय सहभाग. ङगरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न आणि मार्गदर्शन. अंधश्रद्धा निर्मूलन शिबिरांचे आयोजन करून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न. संस्थेच्या विविध उपक्रमात अग्रणी भूमिका आणि विद्यार्थ्यांसाठी योग व प्राणायाम शिबिर घेऊन आरोग्याबद्दल जागरूकता करणे आदी अनेक उपक्रम त्यांनी राबवले आहेत.' विद्यार्थी घडवणे' या विचाराने काम करणाऱ्या बाजड सर यांना सिटीन्यूज सुपरफास्ट परिवाराकडून पुढील वाटचालीस शुभेच्छा !

## 'नशामुक्त युवा,विकसित भारत' चा विद्यार्थ्यांनी घेतला संकल्प

### पीएम श्री केंद्रीय विद्यालय वाशिममध्ये विशेष लाईव्ह वेबिनारचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'GenZ Against Addiction : Nasha Mukt Yuva for Viksit Bharat – Sankalp Abhiyan' अभियानांतर्गत पीएम श्री केंद्रीय विद्यालय, वाशिम येथे विशेष लाईव्ह वेबिनार व व्हर्च्युअल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आभासी संबोधनासह देशव्यापी 'नशामुक्ती संकल्प' कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. विद्यालयाच्या स्मार्ट क्लासरूममध्ये डिजिटल स्क्रीनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या राष्ट्रीय अभियानाशी जोडण्यात आले.कार्यक्रमावेळी विद्यार्थ्यांना




मार्गदर्शन करण्यासाठी टीजीटी इंग्रजी श्रीमती स्वार्था तोडे, टीजीटी कला डॉ. प्रीती राय, टीजीटी व ग्रंथपाल श्री. वैभव रमेश जायभाये, टीजीटी कार्यानुभव श्री. सतीश मीणा तसेच पीजीटी रसायनशास्त्र श्री. खान यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन करून नशेपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी पीएम श्री केंद्रीय विद्यालय, वाशिमचे प्राचार्य श्री. सुनील मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नशा ही युवा पिढीच्या विकासातील मोठी अडचण असून, देशाला विकसित भारताच्या दिशेने नेण्यासाठी तरुणाई निरोगी व नशामुक्त असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वतः नशेपासून दूर राहण्यासोबतच आपल्या परिसरातील नागरिकांमध्येही जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे नशेपासून दूर राहण्याची तसेच निरोगी व नशामुक्त समाजनिर्मितीसाठी योगदान देण्याची शपथ घेतली. आगामी काळात विद्यालयात क्रीडा उपक्रम, ध्यानसत्रे आणि नशाविरोधी जनजागृती रॅली आयोजित करण्याचाही संकल्प करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम प्रभावी ठरला.

# विठ्ठल पावला... खामगाव आगाराची आषाढी वारीत विक्रमी कामगिरी

## ६९ बसगाड्यांच्या १३८ फेऱ्यांतून तब्बल ४५.९९ लाखांचे उत्पन्न

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**खामगाव** : ज्ञानोबा-तुकाराम च्या जयघोषात पंढरपूरच्या विठ्ठल दर्शनासाठी निघालेल्या हजारो वारकऱ्यांच्या सेवेत खामगाव आगार यंदाही तत्परतेने उभे राहिले. आषाढी वारीच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या विशेष बस सेवेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, या सेवेतून आगाराने तब्बल ४५ लाख ९९ हजार ५८३ रुपयांचे उत्पन्न मिळविले आहे. वारी कालावधीत खामगाव आगारातून ६९ विशेष बसगाड्या कार्यरत ठेवण्यात आल्या. या बसेसनी मिळून १३८ फेऱ्या पूर्ण करत ५८ हजार ६६३ किलोमीटरचा प्रवास केला. हजारो वारकऱ्यांना सुरक्षित, आरामदायी आणि वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध



### स्पॉट बुकिंगच्या माध्यमातून तीन गाड्या सोडण्यात आल्या

» आषाढी निमित्त पंढरपूर वारीकरिता स्थानिक खामगाव आगारातर्फे ४५ प्रवाशांची बुकिंग असल्यास थेट गावातून बस सोडण्याची व्यवस्था होती. या योजनेअंतर्गत नांदुरा तालुक्यातील वडनेर येथून १३५ वारकऱ्यांची बुकिंग मिळाल्याने वडनेर

करून देण्यात आली. आगार प्रमुख पवन टाले यांनी ही माहिती दिली. वारीच्या गर्दीचा अचूक अंदाज घेऊन बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले होते. बसगाड्यांची नियमित तपासणी, चालक वाहकांची उपलब्धता, अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि प्रवाशांच्या सोयीला प्राधान्य देत संपूर्ण व्यवस्था उभारण्यात आली. त्यामुळे पंढरपूरकडे जाणाऱ्या तसेच परतणाऱ्या वारकऱ्यांचा प्रवास कोणत्याही अडथळ्याविना सुरळीत पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदाही एसटी महामंडळाची सेवा वारकऱ्यांसाठी जीवनवाहिनी ठरली.

विठ्ठल दर्शनाची ओढ आणि एसटीची विश्वासार्ह सेवा यांचा सुंदर संगम या विशेष उपक्रमातून पाहायला मिळाला आहे. प्रवासी सेवेसोबतच उत्पन्नातही लक्षणीय वाढ झाल्याने खामगाव आगाराच्या नियोजनाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. भाविकांची सुरक्षित सेवा हीच आमची खरी विठ्ठल सेवा, या भावनेतून कार्य करणाऱ्या खामगाव आगाराने यंदाची आषाढी वारी यशस्वी करून दाखविली.

» परिवहन मंडळाच्या सुरक्षित प्रवासाचा लाभ यावेळी मोठ्या प्रमाणात वारकरी मंडळींनी घेतला. पंढरपूर वारीकरीता महिलांना ५० टक्के सवलत आणि ७५ वर्षावरिल जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाचा लाभयामध्ये देण्यात आला. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही खामगाव परिसरातून मोठ्यासंख्येने वारकऱ्यांनी परिवहन मंडळाच्या लालपरिन सुरक्षित प्रवास अनुभवला.

- पवन टाले,
आगार व्यवस्थापक खामगाव.

# वारी येथे बुडलेल्या युवकाचा मृतदेह 22 तासाने नदीत मिळाला

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**सोनाळा** : सातपुड्याच्या कुशीत वारी हनुमान येथे शनिवार १ आगष्ट रोजी खुटपुरी ता. खामगाव येथील २० वर्षीय युवक योगेश प्रकाश वानखडे वाण नदीच्या मेळाच्या डोहात बुडला होता. २२ तासांच्या सर्च ऑपरेशननंतर रविवारी २ आगष्टच्या सकाळी १० वाजता त्याचा मृतदेह सापडला. हे स्थळ १०० फुट दूर वाण नदी पात्रात बुलढाणा जिल्ह्याच्या हद्दीत आहे. त्यामुळे सोनाळा पोस्टेच्या पोलीसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली. पंचनामा करून प्रेत वरवट बकाल ग्रामिण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविले. त्यानंतर खुटपूरी ता. खामगाव येथे योगेशवर शोकाकुल वातावरणात दुपारी ५ वाजता अंतिमसंस्कार करण्यात आला.

दोन मित्रांना वाचवतांना स्वतः योगेश नदीत बुडाला. तर नदीत बुडतांना वाचलेले ओम प्रशांत बोचरे वय २० वर्षे यास सईबाई मोटे रुग्णालयात तर आकाश विनोद वानखडे वय २४

यास अकोला शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

सोनाळा पोलीस कर्मचारी व हिवरखेड रूपराव पोस्टेचे कर्मचारी तसेच खुटपुरी येथील अनेकजण रात्रभर घटना स्थळावर ठाण मांडून होते. स्थानिक आदिवासी युवकांच्या मदतीने पोलीसांनी शोध मोहिम सुरु होती. मात्र रात्री मृतदेहाचा शोध लागला नाही. सकाळी पुन्हा डोहानजीक वाण नदीत अंथाग पाणी असलेला ठिकाणी शोध मोहिम राबविण्यात आली. १० वाजून २५ मिनिटांनी नदी पात्रात १०० फुट दूर खोल पाण्यात मृतदेह आढळून आला.

येथे पोहेकॉ शाकीर पटेल यांनी पंचनामा केला. यावेळी अनेकांनी एकच हंबरडा फोडला. सहलीसाठी मित्रांसह वारी हनुमान येथे आल्यावर शनिवारी दुपारी १ वाजता वाण नदीत ओम व आकाश यांना नदीत पोहण्याचा मोह झाला . म्हणून नदीत त्यांनी पोहण्यासाठी उडी घेतली. मात्र ते बाहेर न आल्याने योगेशने पण नदीत उडी मारली. तो वर आलाच नाही. यामुळे एकच धांदल उडाडी. इतरांनी दोघांना वाचविले. मात्र योगेश पाण्यात बेपत्ता असल्याने सर्वत्र एकच खळबळ माजली.

मात्र पोलीसांनी तत्काळ घटना स्थळावर धाव घेत शोधमोहिम सुरु केली वाण नदी हद ऐलतिरी बुलढाणा जिल्ह्यात आहे. तर नदीचा पैलतिरी भाग हा अकोला जिल्ह्यात आहे. त्यामुळे दोन्ही जिल्ह्याचे पोलीस घटना स्थळावर ठाण मांडून होते.

# लाडक्या बहिणींची मुंबईकडे कुच

**सोनाळा** : भलाडकी बहीण योजनेची केवायसी वेब साईट गेल्या ८ महिन्यांपासून पासून बंद आहे. त्यामुळे पात्र असून ही उपरोक्त योजनेच्या लाभापासून अनेक महिला वंचित आहेत. केवायसी सह थकीत हप्त्यांचा लाभ मिळावा यासाठी संग्रामपूर शेगाव जळगाव जामोद तालुक्यातून महिला आझाद मैदान मुंबई मुंबई कडे रविवार २ आगष्ट रोजी रवाना झाल्या आहेत. सोनाळा येथील अनाथ गरजूंचे सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल वंदना मधूकर महाले यांच्या नेतृत्वात महिला ठिय्या आंदोलनासाठी क्रुझर ने रवाना झाल्या. गेल्या अनेक दिवसांपासून केवायसी होत नसल्याने लाडक्या लाडक्या बहीण योजनेत महिलांना माधनासाठी ठेंगा दाखवण्यात आला. यामुळे ग्रामिण भागातील महिलांचा आवाज मुंबई पर्यंत पोहचविण्यासाठी सर्व महिलांना एकजूट करून महाले यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांचे कडे प्रत्यक्ष पत्रव्यवहार केला. व केवायसी सुरु करण्याची मागणी केली.

# मद्यप्राशन करून वाहन चालविणे भोवले; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मलकापूर** : मलकापूर शहर पोलिसांनी राबविलेल्या ड्रंक अँड ड्राईव्ह विशेष मोहिमेदरम्यान दारूच्या नशेत वाहन चालविणाऱ्या एका चालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, सागर अरुण खर्चे (वय ३२, रा. भालेगाव, ता. मलकापूर) हा १ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास मलकापूर येथील तहसील चौक परिसरात एमएच-२८-एयू-१२७६ क्रमांकाची होंडा कंपनीची दुचाकी दारूच्या नशेत चालविताना आढळून आला. यावेळी पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर येथे वैद्यकीय तपासणी केली. तपासणीनंतर संबंधित चालक दारूच्या अमलाखाली असल्याचा अभिप्राय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार पोलीस कॉन्स्टेबल मोहन समाधान करांगळे यांच्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलीस ठाण्यात कायमी गुन्हा क्रमांक ५६१/२०२६ अंतर्गत मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल दिलीप रोकडे करीत आहेत. मलकापूर शहर पोलिसांनी मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरू ठेवली असून वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित वाहन चालवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नांदुऱ्यात बँकेजवळून दुचाकी चोरीला; गुन्हा दाखल

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**नांदुरा** : शहरातील खामगाव अर्बन बँकेच्या शाखेजवळ उभी केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी नांदुरा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निवृत्ती नारायण बोरसे (६०, रा. घाटपुरी नाका, खामगाव) यांनी १ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० ते दुपारी १२:१५ या वेळेत खामगाव अर्बन बँकेच्या नांदुरा शाखेजवळ सुनील सपकाळ यांच्या घरासमोर मोटारसायकल उभी केली होती. काम आटोपून परत आल्यानंतर मोटारसायकल जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरीस गेलेली मोटारसायकल एमएच २८ एएक्स ४४८५ क्रमांकाची असून ती काळ्या रंगाची आहे. या मोटारसायकलची अंदाजे किंमत ३५ हजार रुपये असल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून नांदुरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत

# जळगाव जामोद येथे दुकानातून 90 हजारांची रोख रक्कम लंपास!

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**जळगाव जामोद** शहरातील बालाजी मंदिराजवळील बालाजी ट्रेडिंग दुकानातून अज्ञात चोरट्याने ९० हजार रुपयांची रोख रक्कम व विविध बँकांची चेकबुके असलेली पिशवी लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी दि. २ ऑगस्ट रोजी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हरीदास माणिकराम माटे (वय ४५, रा. जळगाव जामोद) हे धान्य व्यापारी आहेत. त्यांनी घरून पिशवीत ९० हजार रुपयांची रोकड तसेच चार बँकांची एकूण आठ चेकबुके घेऊन दुकानात आणली होती. ही पिशवी त्यांनी दुकानातील काउंटरच्या उजव्या कोपऱ्यात ठेवली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्याने संधी साधून काउंटरवरील पिशवी चोरून नेली. काही वेळाने पिशवी जागेवर नसल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलिसांत तक्रार दिली. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात गुन्हा भारतीय न्यायसंहिता कलम ३०५ अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास महिला पोलिस हवालदार दीपमाला वानखडे करीत आहेत.

# लाखोंचे क्रीडा संकुल की पाण्याचा तलाव?

## मुसळधार पावसाने नांदुरा तालुका क्रीडा संकुलाची दुरवस्था; नगर परिषदेकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**नांदुरा** : नांदुरा शहरात लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या तालुका क्रीडा संकुलाला ३० व ३१ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला आहे. संपूर्ण क्रीडा संकुल परिसरात पाणी साचल्याने क्रीडा संकुलाला अक्षरशः तलावाचे स्वरूप आले आहे. शहरासह तालुक्यातील अनेक युवक-युवती पोलीस, सैन्य, क्रीडा तसेच विविध शासकीय भरतीसाठी येथे शारीरिक सराव करण्यासाठी येतात. मात्र, पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचल्याने मैदानाचा वापर करणे कठीण झाले असून, सरावासाठी येणाऱ्या युवक-युवतींची मोठी गैरसोय होत आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेल्या या क्रीडा संकुलात पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होऊ नये, ही गंभीर बाब आहे. पाणी साचण्यामागील कारणांचा शोध घेऊन कायमस्वरूपी जलनिस्सारणाची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नांदुरा नगर परिषदेने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन साचलेले पाणी काढणे, नाल्यांची स्वच्छता करणे तसेच पावसाचे पाणी क्रीडा संकुलात साचणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे. क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी उभारलेले संकुल पावसाळ्यातच जलमय होत असेल, तर त्याच्या नियोजनावर आणि देखभालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रलंबित गोदाम भाडेप्रश्नी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा पाठपुरावा

## अस्तित्व संघटनेच्या मागणीची दखल; भाडे अदा व स्टोरेज दरवाढीची मागणी

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मलकापूर** : शेतकरी उत्पादक कंपन्यांना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ व पुरवठा विभागाकडून गोदामांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले भाडे तातडीने अदा करण्यात यावे तसेच स्टोरेज दरात वाढ करण्यात यावी, या मागणीची दखल घेत केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) तथा केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी संबंधित विषयावर पाठपुरावा सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. अस्तित्व संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा प्रेमलता सोनोने यांनी या संदर्भात निवेदन सादर करून शेतकरी उत्पादक कंपन्यांसमोरील आर्थिक अडचणींकडे लक्ष वेधले होते. या निवेदनात अनेक कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात बँक कर्ज घेऊन, तर काही कंपन्यांनी स्वतःची गुंतवणूक करून गोदामांची उभारणी केल्याचे नमूद करण्यात आले आहे. गोदामांची निर्मिती झाल्यानंतर विविध कंपन्यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ तसेच पुरवठा विभागाला ती भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिली. मात्र, अनेक वर्षांपासून गोदामांचे भाडे प्रलंबित असल्याने संबंधित कंपन्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनानुसार, सध्या मिळणारे भाडेदरही अत्यल्प असल्याने गोदामांची देखभाल, प्रशासकीय खर्च, नवीन प्रकल्पांची अंमलबजावणी तसेच बँक कर्जाचे नियमित हप्ते भरणे अनेक कंपन्यांना कठीण जात आहे. परिणामी, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत असून ग्रामीण भागातील कृषीपूरक उपक्रमांनाही त्याचा फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर संवर्धनसृष्टी फार्मर प्रोड्युसर कंपनीसह इतर शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या वतीने प्रलंबित भाडे तातडीने अदा करावे, स्टोरेज दरांचे पुनर्निर्धारण करून त्यात वाढ करावी आणि कंपन्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय निर्णय घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. अस्तित्व संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा प्रेमलता सोनोने यांनी मांडलेल्या मागणीची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दखल घेत संबंधित स्तरावर पाठपुरावा सुरू केला असल्याचे सांगण्यात आले. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या अडचणींवर सकारात्मक निर्णय झाल्यास त्यांना मोठा दिलासा मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली आहे.

# पुराच्या गाळात नांदुरा-जिगाव बस फसली; विद्यार्थी, नागरिकांचे हाल

## टाकळी वतपाळ गावाजवळ केदार नदीच्या पुलानजीक बस फसली; गावकऱ्यांच्या मदतीने जेसीबीच्या सहाय्याने बस बाहेर

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**नांदुरा** : नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे टाकळी वतपाळ गावाजवळ केदार नदीच्या पुलानजीक मोठ्या प्रमाणात गाळ व चिखल साचला आहे. याच ठिकाणी आज ३ ऑगस्ट, सोमवार रोजी सकाळी ८ वाजता नांदुरा ते जिगाव जाणारी विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी बस गाळात फसली. बस फसल्याने विद्यार्थ्यांसह प्रवासी नागरिकांची मोठी गैरसोय झाली. विशेष म्हणजे आज नांदुरा येथे आठवडी बाजाराचा दिवस असल्याने जिगावसह परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात नांदुराकडे ये-जा असते. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे.बस गाळात फसल्यानंतर गावकऱ्यांनी तत्काळ मदतीचा हात देत छ्ष्टक्च्या सहाय्याने बस बाहेर काढली.

त्यामुळे विद्यार्थ्यांसह प्रवाशांना दिलासा मिळाला. दरम्यान, टाकळी वतपाळ गावाजवळ केदार नदीच्या पुलानजीक साचलेला गाळ तातडीने हटवून रस्त्याची दुरुस्ती करावी, तसेच भविष्यात विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कोलते पॉलिटेक्निक प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा 'इंडक्शन प्रोग्राम' उत्साहात संपन्न

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मलकापूर**:स्थानिक पदमश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक विभाग) येथे शैक्षणिक वर्षाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या नवोदित विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी विशेष च्इंडक्शन प्रोग्रामज् म्हणजेच आरंभिक परिचय व स्वागत सोहळा हा अत्यंत थाटामाटात व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात नव्याने पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची शिस्त, शैक्षणिक वातावरण, विविध उपक्रम आणि भविष्यातील संधी यांची सविस्तर माहिती व्हावी, या उदात्त उद्देशाने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला प्रथम वर्षातील प्रवेशित विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे हे उपस्थित होते. तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. युगेश खर्चे, पॉलिटेक्निक विभागाचे इनचार्ज प्रा. संदीप खाचणे, आय क्यू ए सी डीन प्रा. रमाकांत चौधरी आणि अकॅडमीक कोऑर्डिनेटर प्रा. मनोज वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी पॉलिटेक्निकचे सर्व विभाग प्रमुख प्रा. जयप्रकाश सोनोने , प्रा. साकेत पाटील, प्रा. महेश शास्त्री आणि प्रा. गजानन सुपे हे देखील मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमास अतिथी म्हणून मलकापूरचे मा. तहसीलदार समाधान सोनवणे, प्रजापती ब्रह्माकुमारी दीपाली दीदी, महाविद्यालयाचे सचिव डॉ. अरविंद कोलते तसेच खजिनदार सुधीरभाऊ पाचपांडे यांची विशेष उपस्थिती लाभली. उपस्थितांनी नवनिर्वाचित विद्यार्थ्यांचे शब्दसुमनांनी स्वागत करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना ब्रह्माकुमारी दीपाली दीदी यांनी आजच्या युवा पिढीला व्यसनमुक्ती आणि मानसिक आरोग्याचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. तंत्रज्ञानाच्या युगात प्रगती करताना विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचारसरणी आत्मसात करावी आणि कोणत्याही प्रकारच्या व्यसनाधीनतेला बळी न पडता आपले ठरवलेले ध्येय गाठावे, असे मोलाचे आवाहन त्यांनी केले. त्यानंतर प्रा. रुपाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना अँटी-रॅगिंग नियमावली आणि त्यासंबंधित कठोर कायद्याबाबत सविस्तर माहिती दिली. महाविद्यालय परिसर पूर्णपणे रॅगिंगमुक्त आणि सुरक्षित असून विद्यार्थ्यांना कोणत्याही भीतीविना निर्भय वातावरणात शिक्षण घेता येईल, असा दृढ विश्वास त्यांनी पालकांना आणि विद्यार्थ्यांना दिला. तसेच मा. तहसीलदार समाधान सोनवणे आणि महाविद्यालयच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाचे वाढते महत्त्व, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि भविष्यातील करिअरच्या विविध सुवर्णसंधी यावर अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयातील अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, आजवरचे उत्कृष्ट निकाल आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्लेसमेंटच्या उपक्रमांचा विस्तृत आढावा मांडला. या संपूर्ण भरगच्च कार्यक्रमाचे अत्यंत अभ्यासपूर्ण आणि प्रभावी सूत्रसंचालन प्रा. राजेश हातळकर यांनी केले. या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. किशोर वाडेकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख, अकॅडमीक कोऑर्डिनेटर, सर्व प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार प्रदर्शन करून या शानदार सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# पुन्हा एकदा पेंनटाकळी कालवा फुटला; पिकासह शेतीचे नुकसान

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मेहकर** : गतवर्षी पेंनटाकळी प्रकल्पाचा कालवा फुटून शेतकर्यांचे नुकसान झालेले असतांना यावर्षी देखील पावसामुळे पेंनटाकळी प्रकल्पाचा कालवा फुटल्याने एक हेक्टर जमीन खरडून जात सोयाबीन व तुर पिकाचे नुकसान झाल्याने संबंधित विभागाने नुकसान भरपाई देत शेतीची दुरुस्ती करावी अशी मागणी होत आहे. ३० जुलै रोजी झालेल्या सार्वत्रिक पावसामुळे वरवंड येथील शेतकरी दिलीप प्रल्हादराव देशमुख यांची लोणी काळे शिवारातील गट क्रमांक ८ मधील शेती कालवा फुटल्याने पिकासह खरडून गेली आहे. याच शेतकऱ्याच्या शेतात गेल्यावर्षी देखील कालवा फुटल्याने नुकसान झालेहोते. त्याचवेळी शवंतकऱ्याने स्वखर्चाने कालव्याची दुरुस्ती केली. संबंधित विभागाने कालव्याचे व्यवस्थित केले असते तर आज काम पुन्हा दुसऱ्यांदा सदर शेतकऱ्याच्या शेतीचे व पिकाचे नुकसान झाले नसते. गतवर्षी शेतीवर स्वतः आडमाप खर्च करून शेती व्यवस्थित व पेरण्यायोग्य केली असतांना सदर शेतकऱ्यांसमोर पुन्हा हे नवे संकट उभे राहले आहे. संबंधित विभागाने नुकसान भरपाई देत शेती पेरण्यायोग्य करून द्यावी. अन्यथा आपल्याला आपले जीवन संपवावे लागेल. असा टोकाचा इशाराच शेतकऱ्याने दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. या अनुषंगाने कार्यकारी अभियंता कोरके यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कुठलाही प्रतीसाद दिला नाही.

# रेल्वेखाली आल्याने तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**शेगाव** : जलंब-शेगाव रेल्वेमार्गावर रेल्वेखाली आल्याने एका २९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना २ ऑगस्ट रोजी घडली. मयताची ओळख मंगेश अंबादास राजूरकर (रा. व्यंकटेशनगर, शेगाव) अशी पटली आहे. रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास जलंब व शेगाव स्थानकांदरम्यान रेल्वे रुळावर एका तरुणाचा मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती लोको पायलटने रेल्वे प्रशासनाला दिल्यानंतर रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पोलिसांनी तपास करून मृताची ओळख मंगेश अंबादास राजूरकर अशी पटवून त्यांच्या नातेवाइकांशी संपर्क साधला. या प्रकरणी शेगाव रेल्वे पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, मृत्यूचे नेमके कारण तपासातून स्पष्ट होणार आहे.


सिटी न्यूज सुपरफास्ट
वऱ्हाड
सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com





# गुजरात हेल्मेट उद्योगासाठी महाराष्ट्र पोलिस दक्ष

अकोला : गेल्या काही दिवसांपासून अकोला शहरात वाहतूक पोलिसांकडून दुचाकी चालकांवर 'हेल्मेट सक्ती'ची कारवाई जोरात सुरू आहे. विना-हेल्मेट वाहन चालवणार्‍यांकडून दंड वसूल केला जात आहे, तर दुसरीकडे अकोल्यातील बाजारपेठेत हेल्मेट खरेदीसाठी नागरिकांची झुंबड उडाली आहे. मात्र, या कारवाईच्या आड दडलेली मुख्य गणिते आणि शहरातील वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा आता ऐरणीवर आला आहे. अकोल्यात या एकाच मोहीम किंवा सक्तीमुळे अवघ्या काही दिवसांत सुमारे दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त हेल्मेट विक्रीचा व्यवसाय झाला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, बाजारात उपलब्ध असलेल्या बहुतांश हेल्मेट्सवर योग्य 'आयएसआय' मार्क नसून ती अप्रमाणित आहेत. एकप्रकारे गुजरात आणि इतर राज्यांतील हेल्मेट निर्मिती उद्योगाचे भले करण्यासाठीच महाराष्ट्र पोलिस एवढे 'दक्ष' झाले आहेत का, असा संतप्त सवाल अकोलेकर विचारत आहेत. या संपूर्ण अन्यायी सक्तीविरोधात अकोल्यातील राजकीय नेत्यांनी मात्र 'चुप्पी' साधली असून, लोकप्रतिनिधींच्या या मौनामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष खदखदतो आहे. अप्रमाणित हेल्मेटच्या विक्रीतून कंपन्यांचे भले होत असले, तरी अकोलेकरांच्या सुरक्षेचा प्रश्न मात्र 'जैसे थे'च आहे. शहरात पसरलेली अवैध वाहतूक, ट्रॅफिक सिग्नलचा अभ्रष्ट कारभार, रस्ते अडवणारे ट्रक, फोर-व्हिलरचे बेकायदेशीर पार्किंग आणि अल्पवयीन चालकांचा धुमाकूळ यांसारख्या गंभीर समस्यांकडे पोलिस प्रशासन कधी गांभीर्याने पाहणार, की केवळ दुचाकी चालकांचे खिसे रिकामे करण्यातच धन्यता मानणार, असा परखड सवाल आज संपूर्ण अकोला शहर विचारत आहे. हेल्मेट सक्तीवरून सर्वसामान्यांचे खिसे कापले जात असताना, अकोल्यातील दैनंदिन वाहतूक व्यवस्थेचे तीन-तेरा वाजले आहेत. शहर आणि परिसरातील गंभीर समस्यांकडे वाहतूक शाखा पूर्णपणे डोळेझाक करत आहे. त्यामुळंच आज अकोलेकरांच्या मनात प्रश्नांचा भडीमार सुरू आहे.



## ...पण अकोल्यातील वाहतुकीच्या 'खऱ्या' समस्यांकडे दुर्लक्ष का ?



### अवैध प्रवासी वाहतूक आणि ग्रामीण ऑटोचा सुळसुळाट

अकोला शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या ऑटोंचा अतोनात सुळसुळाट झाला आहे. या ग्रामीण ऑटोंवर आणि शहरात चालणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई केव्हा होणार? ऑटोमध्ये नियमानुसार तीन प्रवाशांची मर्यादा असताना सर्रास ५ ते ६ प्रवासी कोंबून वाहतूक केली जाते. या उघड्याडोळ्यांनी चालणाऱ्या बेकायदेशीर प्रकाराला आणि अवैध वाहतुकीला नक्की कोणाचा आशीर्वाद लाभला आहे? शहरात ऑटोंना मीटर केव्हा लागणार आणि हे ऑटो मीटरप्रमाणे नियमाने केव्हा धावणार, असा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

### दुचाकी चालकच 'सॉफ्ट टार्गेट' का?

वाहतूक पोलिसांना केवळ दुचाकी चालकच 'सॉफ्ट टार्गेट' वाटतात का ? शहरात नेकलेस रोड, सर्रासपणे रस्त्याच्या दोन्ही बाजूला फोर-व्हिलर गाड्यांचे बेकायदेशीर पार्किंग केले जाते, ज्यामुळे तासनतास वाहतूक कोंडी होते. नो-पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दुचाकी त्वरित टोईंग करून उचलून नेल्या जातात; मग या रस्त अडवणाऱ्या फोर-व्हिलर गाड्यांवर टोईंगची कारवाई का केली जात नाही ? फोर-व्हिलरवाले पोलिसांचे लाडके आहेत का ? असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत.





### ब्लॅक फिल्म्स, फॅन्सी नंबर आणि कानठळ्या बसवणारे प्रेशर हॉर्न

शहरात अनेक महागड्या गाड्यांना काळ्या काचा लावलेल्या असतात, तर अनेकांच्या गाड्यांवर नियमांचे उल्लंघन करणारे 'फॅन्सी नंबर' असतात. रात्रीच्या वेळी डोळे दीपवून टाकणारे बीम लाईट्स आणि हायपॉवर लाईट्स लावून गाड्या चालवल्या जातात. याशिवाय शहरात कानठळ्या बसवणारे प्रेशर हॉर्न वाजवत फिरणाऱ्या वाहनांवर कारवाई कोण करणार? या नियमांचा भंग करणाऱ्यांवर महिना न् महिना कोणतीही ठोस कारवाई का होत नाही ?

### अपघातप्रवण 'ब्लॅक स्पॉट' आणि बंद पडलेले वाहतूक सिग्नल



अकोला शहरातून गेलेल्या महामार्गांवर आणि अंतर्गत रस्त्यांवर प्रशासनाने अनेक 'ब्लॅक स्पॉट' (अपघातप्रवण क्षेत्रे) चिन्हांकित केले आहेत. परंतु, यातील किती ब्लॅक स्पॉटवर प्रत्यक्ष उपाययोजना करण्यात आल्या ? जुन्या इन्कम टॅक्स चौकात दररोज वाहतुकीची प्रचंड कोंडी होते, तिथे वाहतूक सिग्नल का बसवला जात नाही ? शहरात बसवलेले काही ट्रॅफिक सिग्नल सुरू आहेत, तर काही महिनोनमहिने बंद पडलेले आहेत; हे बंद पडलेले सिग्नल नेमके कोण दुरुस्त आणि सुरू करणार?

### कोचिंग क्लासेस परिसर: अल्पवयीन चालकांचा थरथराट

शहरातील मुख्य कोचिंग क्लासेसच्या परिसरात अल्पवयीन मुले भरधाव वेगाने आणि धोकादायक पद्धतीने गाड्या चालवताना दिसतात. अनेकदा एकाच दुचाकीवर 'ट्रिपल सीट' बसून तरुण हुल्लडबाजी करतात. अशा वेळी ट्रिपल सीट कारवायांवर ब्रेक का लागला आहे ? धोकादायक वाहन चालवणाऱ्या या अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या पालकांवर पोलिस कडक कारवाई केव्हा करणार ?




### रस्ते अडवणारे ट्रक आणि फिक्स पॉईंटवरील पोलिस कुठे?



बाळापूर रोड आणि पातूर रोडवर रस्त्यावरच अस्ताव्यस्त उभे असलेले भलेमोठे ट्रक अपघातांना आमंत्रण देत आहेत. या रस्त्यावरील ट्रक हटवण्याची तसदी प्रशासन का घेत नाही ? दुसरीकडे, शहरातील ज्या मुख्य चौकांत किंवा 'फिक्स पॉईंट'वर ट्रॅफिक पोलिस तैनात केले जातात, ते पोलिस तिथे किती वेळ उपस्थित असतात, हा एक मोठा संशोधनाचा विषय बनला आहे. उपस्थित असण्यापेक्षा वसुलीच्या मोहिमेवरच जास्त भर दिला जात असल्याचे चित्र शहरात दिसते.

### किती वकील अन् पत्रकारांवर झाली कारवाई ?

वाहतूक नियमांची अंमलबजावणी ही सर्वसामान्य नागरिकांप्रमाणेच समाजातील प्रत्येक घटकासाठी समान असायला हवी. हेल्मेट सक्तीच्या नावाखाली केवळ सामान्य नोकरदार, कामगार आणि विद्यार्थ्यांनाच टार्गेट केले जात आहे. मग नियम मोडणाऱ्या किंवा विना-हेल्मेट फिरणाऱ्या किती वकील, पत्रकार किंवा राजकीय कार्यकर्त्यांवर वाहतूक पोलिसांनी आजवर प्रत्यक्ष दंडात्मक कारवाई केली आहे ?

### शाळांच्या बसमध्ये सुरक्षितता

शहरात लहान मुलांची वाहतूक करणाऱ्या शेकडो स्कूल बस आणि व्हॅन धावत आहेत. शासनाच्या नियमानुसार स्कूल बसमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने 'सीसीटीवी' कॅमेरे असणे अनिवार्य आहे. परंतु, अकोला शहरातील किती स्कूल बसमध्ये प्रत्यक्ष सीसीटीव्ही बसवले गेले आहेत आणि वाहतूक शाखा त्यांची नियमित तपासणी करते का?




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135